
Shree Nisargadatta Samadhi Charitable Trust, Mumbai
श्री निसर्गदत्त समाधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई द्वारा प्रकाशित त्रैमासिक

# NISARGAVAANI
# निसर्गवाणी ನಿಸರ್ಗವಾಣಿ निसर्गबानी

वर्ष २ रे अंक : ३ रा (जानेवारी ते मार्च २०२६) Year 2nd Issue 3rd (January - March 2026)

## ZERO EVERYTHING IS NOTHING

## श्री सद्गुरू रणजित महाराज



दिसणारे जग खरे मानल्यामुळेच मन तुमच्यावर राज्य करते.
जगत म्हणजे जे गेलेले आहे. म्हणजे जे नाहीच ते! तुम्ही काही तरी
होऊनच कर्म करता. स्वतःला काहीच मानले नाही तर!!
तेच अज्ञान अख्ख्या जगाला टेकू आहे... मनाचा!!

**संपादक**

**डॉ. धीरज सर्वज्ञ : +91 9881314214**

**विजया नाझरे : +91 9403707936** **स्मिता थोरात : +91 8698863395**

**तुषार नाईक : +91 8369105437 / 982188356**

**मुखपृष्ठ रचना: भरतभाई शिंपी, जळगाव**

**मांडणी आणि अंतर्गत सजावट**

**झेन प्रकाशन मुंबई ( निसर्गवाणी समुहाकडून प्राप्त लेखादि साहित्या नुसार)**

**वेबसाईट:** www.nisargdattasamadhi.in

**ईमेल:** nisargadattasamadhitrust2025@gmail.com

## लेखकांना आवाहन

कोणत्याही मासिकाची पहिली आवश्यकता म्हणजे प्रतिथयश आणि होतकरू लेखकांकडून मासिकासाठी दर्जेदार लेख मिळविणे. आत्मज्ञान हा विषय कोणत्याही धर्म, जाती भेद या पलीकडचा आहे याचे कायम स्मरण बाळगून केवळ निसर्गदत्त महाराज यांच्या आत्मज्ञान शिकवणीचाच इथे अंतर्भाव न करता सोबत भारतातील संत-साधु यांची चरित्रे, त्यांची पारमार्थिक शिकवण, विविध संप्रदायातील पारमार्थिक शिकवण, पौराणिक कथा आदि अनेक लेखांचा आणि अर्थातच वाचकांचा प्रतिसाद आणि अभिप्राय याचाही निसर्गवाणी त्रैमासिकात समावेश करण्याचा उद्देश आहे. अध्यात्मज्ञान हे देश-कालातीत असे पवित्र ज्ञान आहे यावर आमची पूर्ण निष्ठा आहे.

## उपयुक्त सूचना

या त्रैमासिकातील पृष्ठ संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून लेखकांना एक नम्र सूचना आहे की छोट्या लेखासाठी साधारण ७५० शब्द संख्या असावी, मध्यम आकाराच्या लेखा साठी साधारण १५५०० शब्द संख्या असावी आणि दीर्घ लेखासाठी साधारण २३०० पर्यंत शब्द संख्या असावी.

कृपया निसर्गवाणी त्रैमासिकाच्या खालील मेल आयडी वर आपले लेख पाठवावेत

nisargavaani240125@gmail.com

## संपादकीय

# श्री निसर्गदत्त महाराज आणि श्री जिड्डु कृष्णमूर्ती

शतकानुशतकांची भारतीय अध्यात्म परांपरा ही मूलतः बाह्य आचार, लौकिक अनुष्ठान आणि ईश्वर विषयक संकल्पनानी भरलेली दिसते. पण त्या परंपरेच्या मध्यभागी काही असे तेजस्वी बिंदू आहेत जे सर्व धार्मिक चौकटी पलीकडे जाऊन अंतर्गत सत्याचा थेट अनुभव देण्यावर भर देतात. विसाव्या शतकात अशा तेजस्वी बिंदूमध्ये दोन नावें सर्वात जास्त उजळून दिसतात, ती म्हणजे श्री निसर्गदत्त महाराज आणि श्री जिड्डु कृष्णमूर्ती.

एक जण मुंबईतील छोट्या बीडीच्या दुकानाचा मालक, प्रथम दर्शनी जवळपास बकाल दिसणा-या परीसरात राहणारा साधा माणूस तर दुसरा जागतिक संस्थाच्या संस्कारात घडवलेला, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, शिक्षण आणि मानवी चेतनेचा जागतीक पातळीवर अभ्यास करणारा एक विश्व नागरिक ! पार्श्वभूमी, भाषा, संदर्भ, बाह्यपरंपरा या सर्वामध्ये खरे तर ते दोघे परस्परापासून अगदी भिन्न अनुभवाचे ! पण ज्ञानाचे केंद्र मात्र एकच—स्वत:चे स्वरूप ओळखणे आणि मनाच्या कल्पनांच्या आवरणातून मुक्त होणे. त्यांच्या शिकवणीतील साम्य हे केवळ शब्दांच्या साम्याने समजून येत नाही; ते साम्य अनुभवाच्या स्वरूपात आहे. हा अनुभव म्हणजे “अहंकाररहित निरीक्षण” आणि “स्वरूपाची तत्काळ जागृती”. दोघेही सांगतात की सत्य हे कोणत्याही सिद्धांताचे, पंथाचे किंवा तात्त्विक स्थापनेचे विषय नसून, ते थेट पाहण्याचे प्रकार आहेत.

आपण दोघांच्या शिकवणीत खोलवर उतरून पाहिले तर त्यांच्या भाषेतील, तात्त्विक दिशेतील, पद्धतीतील आणि अध्यात्मातील साम्याचे सूक्ष्म धागे लक्षात येतात. हे साम्य बाह्य तत्त्वज्ञानातील नाही; तर ते त्यांच्या शिकवणीच्या नादात, तत्काळतेत, अनुभविक आवाहनात आणि आत्म्याच्या स्वरूपाच्या शोधात आहे.

जे कृष्णमुर्ती आणि निसर्गदत्त महाराज या दोघांच्या शिकवणीतील जाणवणारे सर्वात स्पष्ट साम्य म्हणजे दोघेही सत्याला अनुभवात्मक करून दाखवतात, बौद्धिक

नाही. जे कृष्णमुर्ती सतत सांगतात की विचाराच्या संरचनेत अडकलेल्या मनाने सत्य समजणे अशक्य आहे.

तर निसर्गदत्त म्हणतात "तुमच्या असण्याच्या अनुभूती पलीकडे तुम्ही काय शिकणार ? 'मी आहे' ही भावना अनुभव, आणि मग जाण."

दोघांमध्ये एक समानता आहे की ते शिष्याला, भक्ताला, वाचकाला कोणतेही नवे विश्वास देत नाहीत. ते म्हणतात: विश्वास सोडा. प्रत्यक्ष पाहा. अनुभव घ्या. स्वतःला ओळखा.

कृष्णमुर्ती कोणत्याही धार्मिक परंपरेशी स्वतःला जोडत नाहीत. तर निसर्गदत स्वतःला अद्वैतवादी म्हणतात; त्यांच्याकडे वेदांताची भाषा आहे. कृष्णमुर्ती जरी वेदांत नाकारत असले तरी त्यांच्या निष्कर्षांची जागा वेदांताच्या उच्चतम अनुभूतीच्या समकक्ष आहे.

निसर्गदत्त म्हणतात: "You are the Absolute." तर कृष्णमुर्ती म्हणतात: "When there is no centre, there is freedom." भाषा वेगळी, परंतु अनुभवाचा बिंदू एकच...स्वरूपाची अखंड जागृती.

निरीक्षणाचा शोध घेण्याची दोघांची समान अध्यात्मिक पद्धत आहे. कृष्णमुर्ती म्हणतात: "Observe without the observer." निसर्गदत म्हणतात: "Stay with the sense of 'I Am' as the pure witness." निरीक्षण हे दोघांच्या दृष्टीने मुक्तीचे केंद्र आहे. या निरीक्षणात न न्याय असतो, न निवड, न प्रयत्न. ते अशर्त असते — spontaneous. इथे त्यांची भाषा एकच सूर वाजवते: मनाच्या हालचाली पाहताना 'मी पाहतो आहे' ही कल्पना नष्ट होते आणि शुद्ध जागरूकता उरते.

ज्ञानाचा नकार आणि थेट अनुभूतीचा आग्रह या दृष्टीने दोघेही सांगतात की ज्ञान, पुस्तके, तत्त्वज्ञान या सर्व गोष्टी मानसिक जगात आहेत. त्या उपयुक्त असल्या तरी सत्याला स्पर्श करवून घेऊ शकत नाहीत. कृष्णमुर्ती सांगतात की ज्ञान हे स्मृतीचे संघटन असल्याने ते 'जिवंत' नसते. निसर्गदत्त म्हणतात की शब्द सत्य नाही: शब्द म्हणजे बोट, सत्य म्हणजे चंद्र. दोघेही शब्दाचा वापर करून आपणास शब्दा पलीकडे नेतात.

दुःखाचे मूळ कारण यावर दोघांनी समान उकल केली आहे. कृष्णमुर्ती दुःखाचे मूळ सांगतात - आकांक्षा, अपयश, तुलना, भीती, स्मृती, स्वतःची प्रतिमा. निसर्गदत्त दुःखाचे मूळ सांगतात— अहंकार आणि विश्वाशी स्वतःला वेगळे मानणे. परंतु या दोन निरनिराळ्या प्रतिमा एका खोल बिंदूवर एकत्र येतात: 'स्व' आणि 'विश्व' यांच्यातील

विभाजन ही कल्पना आहे. ती खोटी असल्याचे लक्षात येताच दु:ख संपते.

जे कृष्णमूर्ती मध्ये ‘choiceless awareness’ ही संकल्पना आहे. तर निसर्गादत्तां मध्ये ‘आत्मस्वरूपाची अखंड अनुभूती’ ही कल्पना आहे. दोन्हींचे लक्ष्य एकच— अखंड, अविचल, निवड नसलेली, शांत, प्रकाशमान उपस्थिती.

कृष्णमुर्ती प्रेमाला ‘state of being’ म्हणतात. तर निसर्गदत्त प्रेमाला ‘सर्वव्यापकता’ म्हणतात. दोघेही सांगतात की प्रेमात ‘मी’ नसतो, प्रेमात भीती नसते, प्रेम हे स्वतंत्रतेतून उमलते. त्यांच्या प्रेमाच्या व्याख्यांत अहंकाराला जागा नाही.

कृष्णमुर्ती सांगतात की प्रयत्न केला की मन ताण निर्माण करते. तर निसर्गदत्त सांगतात की प्रयत्न म्हणजे अहंकाराची हालचाल. दोघेही एकच आग्रह धरतात की जागृती ही प्रयत्नाने येत नाही; ती प्रयत्नशून्य पाहण्याने येते.

शिष्य आणि गुरु यांच्यातील नाते याचे विवरण करताना कृष्णमुर्ती शिष्यार्थीला पूर्ण स्वातंत्र्य देतात— त्यांच्याकडे ‘बाध्यता’ नाही. तर निसर्गदत सांगतात की शिष्याने गुरुच्या शब्दात नव्हे, तर स्वतःच्या अनुभवात उतरावे. मात्र दोघेही चिंतनाची स्वतंत्रता देतात.

या थोर ज्ञानी पुरुषांच्या जीवनातील साधेपणा आणि प्रामाणिकता नजरेत भरतो. दोघेही अत्यंत साधेपणाने जगले—ना प्रसिद्धीचा आग्रह, ना भक्तांची अपेक्षा, ना मठादि संस्थेची निर्मिती. दोन्ही महात्म्यांची प्रामाणिकता इतकी प्रबळ होती की त्यांच्या उपस्थितीमध्ये साधा शब्दही गूढतेने भरलेला वाटतो. म्हणूनच दोघांनीही मानवी चेतनेच्या इतिहासात अनोखे स्थान मिळवले आहे. त्यांच्या शिकवणीत बाह्य भाषेची, सांस्कृतिक संदर्भांची, पद्धतीची फाटाफूट दिसते, पण त्यांच्या अनुभवाच्या केंद्रात मात्र एकच प्रकाश आहे.

अखेरीस त्यांच्या शिकवणीतील काही मूलभूत स्वरूपाच्या मुद्द्यांचे पुन्हा एकदा अवलोकन करूया. ते म्हणजे :

सत्य थेट आहे, तात्काळ आहे.

अहंकार ही कल्पना आहे.

निरीक्षण मुक्ती देते.

प्रेम म्हणजे ‘मी’चा अभाव.

उपस्थिती म्हणजे सत्याचे दार.

गुरु बाहेर नाही; अनुभूती मध्ये आहे.

विचाराच्या गोंधळावर मात करण्याचा मार्ग म्हणजे ‘पाहणे’.

भीतीच्या मूळाशी जाणे म्हणजे स्वातंत्र्य.
सत्य कोणत्याही सिद्धांताचे नसते.
मुक्ती ही प्रयत्नाची नव्हे; प्रयत्नरहीत जाणिवेची उमलणारी कृपा आहे.

या दोघांच्या  शिकवणीचा अभ्यास केल्यावर आढळून येते  की अद्वैत वेगवेगळ्या भाषेत बोलले तरी त्याचा अनुभव एकच असतो. तो म्हणजे मानवी चेतनेला बंधनातून मुक्त करणे आणि तीला स्वतःचे स्वरूप दाखविणे.

तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा!!

**मुखपृष्ठ रचना: भरतभाई शिंपी, जळगाव**

इंचगिरी संप्रदायातील  थोर संत  श्री सिद्धरामेश्वर महाराज यांचे शिष्य आणि श्री निसर्गदत्त महाराज यांचे परम गुरुबंधू सद्गुरू श्री रणजीत महाराज यांची ४ जानेवारी रोजी जयंती साजरी झाली. 'निसर्गवाणी' परिवाराकडून या महान संताला विनम्र अभिवादन! त्या निमित्ताने २०२६ या नवीन वर्षात प्रकाशित होणा-या  ३-या निसर्गवाणी त्रैमासिकासाठी गुरुभक्त परम मित्र श्री भरत शिंपी यांनी श्री रणजीत महाराज यांना आदरांजली म्हणून साजेसे सुंदर मुखपृष्ठ तयार केले आहे.

श्री निसर्गदत्त समाधी
चॅरीटेबल ट्रस्ट

# Nisargavaani

निसर्गवाणी ನಿಸರ್ಗವಾಣಿ निसर्गबानी

वर्ष २ रे अंक ३ रा

जानेवारी - मार्च २०२६


## अ नु क्र म णि का


पूज्य संत श्री रणजीत महाराज

श्रीहंसराजस्वामीं रचित पूर्वारंभ-गाथा

मनोगत

मानवाचे परम कर्तव्य

श्री दासबोधातील सख्य भक्ती

अंतरंगातील श्रीरंग

# पूज्य संत श्री रणजित महाराज

‘नाथ संप्रदाय’ ला शतकानुशतके जुनी परंपरा आहे, म्हणा की साधारण १२व्या शतकापासून, आणि तरीही ती इतकी सुसंगत आहे की अद्वैत शिकवणींच्या विविध शाखांद्वारे आणि विविध संत आणि ऋषींच्या दृढ गुरु-शिष्य परंपरेद्वारे ती आजहि अस्तित्वात आहे. यापैकी सद्गुरू श्री निंबर्गी उर्फ गुरुलिंगजंगम महाराज यांनी स्थापन केलेला “निंबरगी संप्रदाय” अतिशय प्रसिद्ध आहे. १८५७ मध्ये स्थापन झालेला निंबर्गी संप्रदाय आजही आपल्या विविध आध्यात्मिक केंद्रांद्वारे भारतात तसेच परदेशातही जोमाने कार्यरत आहे. संत ज्ञानेश्वर यांच्या “आता विश्वात्मके देवो” या विश्व प्रार्थनेनुसार, नाथ संप्रदायाची पायाभरणीला तर्कसंगत तत्त्वे आहेत की देव प्रत्येकाच्या हृदयात आहे आणि म्हणूनच या सर्व मान्य तत्त्वज्ञानाने जात, धर्म, आर्थिक स्थिती, व्यवसाय, लिंग आणि वय यांचा विचार न करता अनेकांना आकर्षित केले असावे.

सद्गुरू श्री निंबरगी महाराज यांच्या महानिर्वाणानंतर उमदी येथील त्यांचे सत्शिष्य श्री भाऊसाहेब महाराज यांनी इंचगेरी संप्रदाय या नावाने अध्यात्माची ज्योत पुढे नेली. सद्गुरु श्री भाऊसाहेब महाराज यांच्याकडून दीक्षा घेतलेल्या अनेक पूज्य आत्मसाक्षात्कार संतांनी श्री भाऊसाहेब महाराजांच्या महानिर्वाणानंतर ही परंपरा आणखी पुढे नेली. त्यात सद्गुरु श्री अंबुराव महाराज, सद्गुरु प्रा. गुरुदेव रामभाऊ रानडे, सद्गुरु शिवलिंगवक्का, सद्गुरु श्री सिद्धरामेश्वर महाराज, सद्गुरु श्री गिरिमल्लेश्वर महाराज, सद्गुरु श्री चिम्मड महाराज, सद्गुरु श्री कोटणीस महाराज आदि अनेक नावे आहेत.

सद्गुरु श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी त्यांच्या दीर्घ तपश्चर्येद्वारे हे जाणले की आत्मसाक्षात्काराचे जे दोन मार्ग आहेत उदा. विहंग (पक्ष्याचा) मार्ग आणि दुसरा

पिपीलिका (मुंगीचा) मार्ग, यापैकी विहंग मार्ग निवडणे अधिक चांगले, कारण गुरुने दिलेली मंत्र-दीक्षा आणि त्याचे नियमित तासांचे दीर्घ जप यात तुलनेने बराच वेळ लागू शकतो. शिवाय वाढत्या दैनंदिन व्यस्त जीवनातून बराच मोकळा वेळ काढणे अनेकांना कठीण जाऊ शकते. अर्थात निंबर्गी संप्रदायाच्या शिस्तीनुसार श्री सिद्धरामेश्वर महाराजांनी आपल्या सर्व शिष्यांना अनुग्रह दीक्षा दिली हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. तथापि, भक्तिमार्गाचा उपदेश करतानाच त्यांनी ज्ञानमार्गावर अधिक भर दिला.

सन १९३६ मध्ये श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या महानिर्वाणानंतर त्यांच्या अनेक शिष्यांनी आत्मज्ञानाची ज्योत पुढे तेवत ठेवली. श्री निसर्गदत्त महाराज, श्री काडसिद्धेश्वर स्वामी, श्री बाळकृष्ण महाराज, श्री रणजित महाराज, श्री गणपतराव कन्नूर महाराज, श्री विलासानंद महाराज आणि इतर अनेक संत पुरुषांनी आपल्या प्रवचनातून देश आणि देशाबाहेरील असंख्य भाविकांना आत्मज्ञानाची गुरुकिल्ली उलगडून दाखवली.

दिनांक ४ जानेवारीला झालेल्या श्री रणजित महाराजांच्या 112 व्या जयंतीनिमित्त त्यांची शिकवण वाचकांसमोर थोडक्यात या लेखाद्वारे मांडू इच्छितो.

सन १९२४ मध्ये, वयाच्या बाराव्या वर्षी, श्री रणजित महाराज मुंबईत त्यांचे सद्गुरू श्री सिद्धरामेश्वर महाराज यांना भेटले. गुजराती कुटुंबात जन्मलेल्या श्री रणजित महाराजांना गुजराती तसेच मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान होते. सर्वसामान्य मुंबईकरांचे अत्यंत साधे जीवन जगणारे ते आयुष्यभर कायम बॅचलर राहिले. आत्मसाक्षात्कार प्राप्त होऊनही ते जवळजवळ सहा दशके कट्टर ‘साधका’सारखे राहिले. खरे तर गुरूपदाचे अधिकारी (सदगुरु) म्हणून इंचगिरी संप्रदायाच्या शिकवणीचा प्रसार करण्यास ते आधीच सक्षम होते. मला स्पष्ट आठवते की, श्री निसर्गदत्त महाराज ज्या ज्या वेळी त्यांच्या शिष्यांसह विशेष सांप्रदायिक उत्सव साजरा करीत त्या प्रसंगी ते तिथे विशेष उपस्थित असलेल्या श्री रणजित महाराजांना निरुपण करण्यासाठी विनंतीवजा आग्रह करत असत. आणि गुरुबंधुंचा आदर राखत रणजीत महाराज छोटेसे निरुपणही करत. अशी काही प्रवचने मी टिपून घेतली आहेत. ती वाचताना नेहमीच ती सद्गुरू निसर्गदत्त महाराजांच्या प्रवचनांच्या तोडीचीच आहेत असे लक्षात येते. श्री रणजीत महराजांचा निखळ साधेपणा आणि विनम्र स्वभाव यामुळेच त्यानी स्वतःला गुरु म्हणून दाखविण्यास रोखले असावे. तीच गोष्ट म्हणजे त्यांचे दुसरे गुरूबंधू श्री भाईनाथ महाराज यांच्याही बाबतीत होती. मी या महान आत्मज्ञानी संताना त्यांच्या अनुकरणीय साधेपणा बद्दल अतीव आदर आणि नम्र अभिवादन करतो.

श्री रणजित महाराज त्यांच्या वैशिष्ठ्यपूर्ण ज्यात किंचित 'गुजराथी-मिश्र-मराठी' उच्चारांमध्ये अगदी सोप्या पद्धतीने आत्मज्ञानाच्या शिकवणुकीत वापर करतात. दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन ती ऐकताना त्यांचे शब्द थेट तुमच्या हृदयाला छेदून जातात. जेव्हा जेव्हा मला या दोन सदगुरुंची आठवण येते तेव्हा माझ्या मनात एक विचार येतो की श्री निसर्गदत्त महाराज अस्खलित मराठी बोलत असत तर जन्मतः गुजराती असल्याने श्री रणजित महाराज इतके अस्खलित मराठी बोलत नसत. कधी कधी एक किंवा दोन इंग्रजी शब्द, शिवाय निसर्गदत्त महाराज इंग्रजी भाषा वापरत नव्हते. त्यामुळे ते दुभाष्याच्या मदतीवर अवलंबून असत. तर श्री रणजित महाराज आपल्या शिष्यांशी अस्खलित इंग्रजीत संवाद साधत असत. पाश्चिमात्य लोकांमध्ये इतिहास घडवणाऱ्या "मी तेच आहे" (I AM THAT)या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर श्री निसर्गदत्त महाराजांना परकीय भूमीवर व्याख्याने देण्याच्या अनेक ऑफर्स आणि सूचना आल्या होत्या, अर्थात ज्या कधी प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत. परंतु सद्गुरु श्री रणजित महाराजांनी हि उणीव भरून काढली. फ्रान्स, जर्मनी, स्पेन अशा काही युरोपीय देशांना भेटी देऊन त्यांनी प्रवचन दिली ही आपल्या प्रत्येकासाठी विशेष अभिमानाची बाब आहे. वाचकांच्या उपयोगासाठी मी लिहून घेतलेलं त्यांचे शब्द खाली उद्धृत करत आहे.

## सद्गुरु श्री रणजित महाराजः

(प्रवचन:१८/४/२०००-हनुमान जयंती/दहिसर मठ समाधी मंदिराचा पायाभरणी सोहळा, मुंबई)

आज निसर्गदत्त महाराज समाधि दिवस आहे आणि त्यांची जन्म शताब्दी सुद्धा आज !! पण आज!! जन्म आणि समाधी (निर्वाण) हा भ्रम आहे. भ्रमाचा त्याग करावा. गुरुबोध आवश्यक आहे. "मी देह नाही"...गुरू काय उपदेश करतात?...चित्तशुद्धी आवश्यक आहे. मन शुद्ध करण्याचा प्रयत्न करू नका. पण चित्त शुद्ध करा. चांगल्या किंवा वाईट विचारात गुंतणे हा आपल्या मनाचा स्वभाव आहे. चित्त शुद्ध झाल्यावर तुम्हाला ज्ञान मिळते. 'मी आत्मा आहे'... हे ज्ञान तुम्हाला कळते. गुरूशिवाय ज्ञानाची जाणीव होत नाही.

गुरु कसे आहेत? अहंकार नाही! प्रथम गुरु! त्याच्याशिवाय ज्ञान समजू शकत नाही. चित्तशुद्धी शिवाय ते पूर्ण होत नाही. ते (गुरू) जगात विपुल

आहेत. दिग्गज नावे आहेत. पण सद्गुरु कोणाशी लग्न करतात?..लग्न म्हणजे निवड करणे…परमात्माशी लग्न केले!! परमात्म्याला ओळखणे हे सौभाग्याचे लक्षण आहे. (सकाळच्या प्रार्थनेतून ते उद्धृत करत.. **सद्गुरु भेटले हो..फळले भाग्य माझे !!** तुमच्या सद्गुरूंना पूर्णपणे शरण जा.

तुम्हाला फक्त तुमच्या कुटुंबाच्या कल्याणाची चिंता आहे. म्हणून, विचार करा. विचार केला नाही तर समजणार नाही. जिथे अंधार(अज्ञान) आहे तिथे पेटवलं तर? जेव्हा तुम्ही ज्ञान प्राप्त करता तेव्हा असेच घडते. गुरूच्या आनंदाशिवाय काहीही होणार नाही. सद्गुरूंशिवाय तुम्हाला काहीच समजणार नाही. ते (ज्ञान) सर्व गोष्टींचा पाया आहे. पाया समजून घेण्यासाठी आपल्या अहंकारापासून मुक्त व्हा. राजाचा मुलगा राजा होऊ शकतो. जो सद्गुरूंना शरण जातो त्याचेही असेच आहे. गुरु, शिष्याची नियुक्ती करतो, मग शिष्य वाहन चालवतो. असे आहे. तू, मी, फक्त एकच आहोत. पण असे नाही, जोपर्यंत शरीर अस्तित्वात आहे. ..आम्ही शरीर रूपाचा त्याग केल्यावरच. गुरूला विसरल्यावर अहंकार प्रकट होतो. गुरु म्हणजे आई. शरीर आहे तोपर्यंत संकल्पना आहेत. शरीर गेलं की सगळं एकच! प्रत्येकामध्ये एकच देव. ..चोरात तसेच फसवणूक करणाऱ्यामध्येही. निसर्गदत्त हा सर्वांचा पाया होता. ‘मी आहे’ सर्वांमध्ये व्याप्त आहे, सर्व काही माझ्यामध्ये व्याप्त आहे.


मन तुमच्यावर राज्य करते कारण तुमचा विश्वास आहे की दृश्य जग वास्तविक आहे. जगत..म्हणजे जे काय गेले ते ..म्हणजे काय नाही! तुम्ही काहीतरी बनून कर्म करा. जर तुम्ही स्वतःला काहीतरी म्हणून गृहीत धरले नाही तर काय !! ते अज्ञान हे संपूर्ण जगाचे केंद्र आहे...मनाचे!! मनाचा अर्थ ‘सांगणे’. तुमच्या म्हणण्यामुळे सर्व काही घडले आहे. फक्त म्हणत चला. स्वत्व- स्वतःची रात्र म्हणजे शिवरात्री. जन्म आणि मृत्यू, पाप आणि पुण्य, सुख आणि दुःख... या सर्व कल्पना आहेत. तुम्ही म्हणता म्हणून ते आहेत.

तुम्ही सर्व काही जाणूनबुजून करता. नकळत गुरु शोधत नाही. केवळ ज्ञानाने तुम्हाला एक विचार समजतो. ज्ञानाशिवाय कोणी विचार करू शकतो का? ज्ञान म्हणजे जाणून घेणे, समजून घेणे. तो त्याच्या जवळ असतो पण त्याला त्याची जाणीव नसते. म्हणून त्याला गुह्यज्ञान असे म्हणतात. मच्छर... त्यालाही ज्ञान आहे...कसे चावायचे हे ज्ञान!! प्रत्येकामध्ये ज्ञान भरलेले आहे.

एकच आहे, दुसरा नाही!!... वेद म्हणतात. ज्ञानाला शिंगे फुटतात का? सर्व काही एकसारखे दिसते! एखाद्याला समजते, कोणाला नाही!! परमार्थ (अध्यात्मिक साधना) करण्यासाठी काय आवश्यक आहे? संतांचा अर्थ असा आहे... शरीर हे पाच तत्वांनी बनलेले आहे. मी सहावा आहे आणि त्यात ज्ञान आहे !! जो सहावा संपतो त्याला संत म्हणतात. ते ज्ञानही मिथ्या आहे, असे समर्थ सांगतात. जे काही नाही ते दाखवणे हे ज्ञानाचे स्वरूप आहे! ज्ञान हे अज्ञान आहे. एक भाऊ आहे आणि तोच म्हणतो, "तो माझा नवरा आहे." संत काय म्हणाले? गुप्त ज्ञान लोकांमध्ये प्रकट होते. आपला फायदा, आपण कोण आहोत हे जाणून घेणे, हाच अंतिम फायदा आहे. "मी ज्ञानाचा अवतार आहे" असे कोणी म्हणते का? ती म्हणते, "ती माझी पत्नी आहे!" अरे! ज्ञानाचा पुतळा! ती जगावर राज्य करते !! संत उघडपणे ज्ञान सांगतात. तुम्ही ज्ञानाचे जनक आहात. ज्ञानाची उत्पत्ती तुमच्यापासून झाली आहे. ज्ञान असत्य आहे.

सन 2000 मध्ये त्यांच्या महानिर्वाणानंतर सद्गुरू श्री रणजित महाराज यांच्या शिष्यांनी त्यांचे सुबक समाधी मंदिर बाणगंगा, वाळकेश्वर येथे उभारले आहे. नुकताच त्यांचा 25 वा पुण्यतिथी समारोह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

**– अनिल चुबे**
ठाणे
(९८१९२१४६६१)



# पूर्वारंभ-गाथा

मागील त्रैमासिकात श्री हंसराज स्वामी यांचे संक्षिप्त चरित्र आपण पाहिले. 'निसर्गवाणी'च्या या अंकापासून यापुढे श्री हंसराज स्वामी यांच्या साहित्याचा अभ्यास सुरु करणार आहोत. प्रथम समर्थ रामदास स्वामी यांचे अध्यात्मपर स्फूटप्रकरण "पूर्वारंभ" यावरील श्री हंसराज स्वामी यांच्या गद्य टिकेचा अभ्यास करणार आहोत. श्री हंसराज स्वामींची टीका गद्यात असून १९ व्या शतकाच्या पूर्वार्धातील मराठवाड्यातील गद्य लेखनाचा एक खास नमुना आपल्याला त्यात पाहायला मिळतो.

'पूर्वारंभ' हे समर्थांचे प्रकरण अल्पाक्षर रमणीय आहे. त्यासंबंधी श्री. शंकर श्रीकृष्ण देवांनी आपला अभिप्राय पुढील शब्दात नोंदवला आहे. ते म्हणतात, "शहाण्याने हे प्रकरण खरोखरच वाचू नये. त्याला वेड लागावयाचे. आपण मरेपर्यंत शहाणेच राहावे व शहाणपणातच मरावे ज्यास वाटत असेल त्याने या प्रकरणाच्या वाटेस जाऊ नये"

श्रीहंसराजस्वामींनी समर्थांच्या दोन ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत. (१) दासबोधाचे सार सांगणारी 'संकेत कुबडी' आणि (२) पूर्वारंभ प्रकरणावरील ही गद्य टीका. हंसराजस्वामींचे बहुतेक सर्व लेखन ओवीबद्ध असून 'तत्त्वझाडा' आणि 'पूर्वारंभ-गाथा' हे दोनच ग्रंथ त्यांनी गद्यात लिहिले आहेत. केवळ गद्यात आहेत म्हणूनच की काय ते अद्याप अप्रकाशित राहिले ! त्यापैकी 'पूर्वारंभ-गाथा' हा ग्रंथ डॉ. ग. वा. करंदीकरांच्या पुढाकाराने प्रकाशित झाला त्याबद्दल डॉ. करंदीकरांचे आभार मानणे उचित ठरेल.

समर्थांच्या प्रकरणाचे नाव 'पूर्वारंभ' असे आहे. हंसराज स्वामींनी आपल्या गद्य टीकेचे नामकरण कोठे केलेले नाही. पण त्यांच्या शिष्यांनी जो त्यांच्या 'हंसपद्धती'

नावाचा चरित्रग्रंथ लिहिला आहे त्यात मात्र ‘पूर्वारंभ जो समर्थकृत। त्यावरी गाथा विस्तारिला’ ( हं. प. ७.८.३० ) असा उल्लेख येतो. त्यामुळे ‘पूर्वारंभ गाथा’ हे त्याचे नाव हंसमंडळाने रूढ केले आहे. वास्तविक गाथा ही पद्यमयच असावी, पण ‘गाथा’ या शब्दाचे मूळ, ‘ग्रंथ या शब्दात आहे. त्यामुळे या गद्य ग्रंथालाही ते शोभून दिसते.

समर्थांचे हे स्फुट प्रकरण अवघ्या साठ ओव्यांचे आहे. पण त्यातील तात्त्विक विचार मात्र उच्चदर्जाचा आहे. समर्थांनी तो विचार प्रश्नोत्तर रूपाने मांडला आहे. हा ‘गुरु-शिष्यांचा संवाद’ आहे. जसा समर्थांच्या बहुतेक ग्रंथात तो आढळतो. त्यामुळे वेदान्तातील गहन विचार अगदी सोपा करून मांडण्याची सोय होते. याही ग्रंथात समर्थांनी त्याच पद्धतीचा अवलंब केला आहे.

या संवादाच्या माध्यमातून समर्थांनी ‘कोऽहम्’ च्या शोधात असलेल्या शिष्याची ‘सोऽहम्’ या ज्ञानात्मक जाणिवेपर्यंत कशी प्रगती झाली हे स्पष्ट केले आहे.

त्या संवादाच्या ओघात “संतांच्या सहवासाने संसाराच्या फेऱ्यातून सुटका होते. बाह्य क्रियांपेक्षा अंत:करणातील मनन, निदिध्यास यांच्या योगाने परमेश्वराची भेट कशी होते, या गोष्टी सद्गुरूंना शरण गेल्यानेच साध्य होतात.

सद्गुरू कोणास म्हणावे, सच्छिष्य कोणास म्हणावे, अधिकारी कोणास म्हणावे,” इ. प्राथमिक परंतु आवश्यक माहिती सांगितल्यानंतर सद्गुरू शिष्याला आत्मस्वरूपाचे वर्णन करून सांगतात. ‘आत्मा सर्वांचा चालक असून तो सर्व दृश्य सृष्टीच्या पलीकडचा असून सर्वव्यापी आहे, हे ते त्याला सांगतात. आत्म्याच्या ठिकाणी सृष्टी ही विवर्तरूपाने असून आत्मस्वरूप तिलाही कसे व्यापणारे आहे, हे सांगितले आहे. त्याचे ज्ञान होण्यासाठी मनादी वृत्तींचा अंत करून केवळ आत्मनिवेदनाने त्याच्याशी अभिन्न होता येते हे सांगितले आहे. पण त्यासाठी शास्त्रग्रंथां पेक्षा सद्गुरूकृपा आणि शिष्याची वैचारिक साधना हीच महत्त्वाची आहे, असे सांगून ग्रंथाचा समारोप केला आहे.

हंसराज स्वामींची टीका मूळ ग्रंथाला धरून असली तरी केवळ प्रतिपद टीका नाही. त्यांनी स्वतःच्या दृष्टिकोनातून या प्रकरणाची स्वतंत्र मांडणी केली आहे. त्यांच्या मते १ ते १५ या ओव्यांमध्ये प्रास्ताविक भाग असून त्यात अनुबंधचतुष्टय, सद्गुरूंची लक्षणे, शिष्याची साधनचतुष्टय संपन्नता, त्याची ज्ञानाविषयीची आस्था व तळमळ इ. विषय आले आहेत. त्यानंतर सद्गुरूंनी केलेला ज्ञानोपदेश आहे. श्री हंसराज स्वामींच्या मते समर्थांनी या ग्रंथात उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा सर्व प्रकारच्या साधकांची सोय पाहिली आहे. सोळाव्या ओवीत सर्व समुदायामध्ये ‘मी कोण?’ याचा विचार करून, शिष्याला स्वतःचे ब्रह्मस्वरूप ओळखण्यास सांगितले आहे. तीव्रतरप्रज्ञ अशा

शिष्याला एवढा उपदेश पुरेसा आहे.

सतरा ते सदोतीस या ओव्यांमध्ये तीव्रप्रज्ञ मध्यम साधकाला उपयोगी पडेल असे आहे. आत्मस्वरूपासंबंधीच्या शिष्याच्या मनातील भ्रामक कल्पना दूर करून, आत्म्याची सत्, चित् आनंद ही लक्षणे प्रस्थापित केली आहेत. त्यानंतर सृष्टि निर्मितीच्या संदर्भातील आरंभ, परिणाम आणि विवर्त हे वाद स्पष्ट करून विवर्तवादच अद्वैत वेदान्ताला कसा अनुकूल ठरतो, हे स्पष्ट केले आहे. त्यानंतर आत्मनिवेदनाच्या साहाय्याने अभिन्न समाधान कसे प्राप्त होते याचे मार्गदर्शन केले आहे.

त्रेचाळीस ते छप्पन या ओव्यांमध्ये आत्म्याची अन्वय-व्यतिरेकात्मक पद्धतीने वर्णने करून त्यानुसार करावयाचा उभयविध अभ्यास सांगितला आहे. शेवटच्या चार ओव्यांच्या आधाराने शब्दज्ञानाच्या भरवशावर मोक्ष मिळत नसून सद्गुरूकृपाच आवश्यक कशी आहे, ते सांगून ग्रंथाचा समारोप केला आहे.

अशा तऱ्हेने हंसराजस्वामींनी आपली वेदान्तविषयक भूमिका या छोटेखानी ग्रंथात मांडली आहे. स्वामींच्या इतर ग्रंथाप्रमाणे विचार आणि अभ्यास हे दोन विभाग येथेही आढळतात. स्फटिकरूप पदार्थांचा आकार लहान असो वा मोठा, त्या दोहोंचीही ठेवण सारखीच असते, तेच हंसराज स्वामींच्या ग्रंथांबद्दलही म्हणता येईल.

## श्रीहंसराज स्वामी कृत 'पूर्वारंभ' प्रकरणावरील गद्य टीका
## श्रीपूर्वारंभ-गाथा

या टीकेस 'पूर्वारंभ-गाथा' हे नाव 'हंसपद्धति' नाम श्रीहंसराज स्वामींच्या चरित्र ग्रंथात दिलेले असून, श्रीकल्याण स्वामी समाधि स्थान जे डोमगाव, तेथेच या ग्रंथाची रचना झाली असल्याचे हंसपद्धतीत (पूर्वारंभ जो समर्थकृत। त्यावरी गाथा विस्तारला हं. प. ७.८३०) नमूद आहे. आत्तापर्यंत या टीकेची एकच प्रत श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात तेवढी उपलब्ध झाली आहे. शंभर वर्षांपूर्वीच मराठवाड्यातील मराठी गद्याचा नमुना, म्हणूनही या टीकेचे भाषेच्या दृष्टीने महत्त्व आहे.

सत्कार्योत्तेजक सभेने प्रसिद्ध केलेल्या 'लघुकाव्ये' नामक ग्रंथात, आरंभी, प्रथमच हे प्रकरण दिले असून, याच्या प्रस्तावनेत श्री. नानासाहेब देव लिहितात, "शहाण्याने हे प्रकरण खरोखर वाचू नये. त्याला वेड लागायचे. आपण मरेपर्यंत शहाणेच राहवे, शहाणपणातच मरावे, असे ज्यास वाटत असेल, त्याने या प्रकरणाच्या वाट्याला जाऊ नये." अशा या अलौकिक वेड लावणाऱ्या छोट्या प्रकरणावर आत्मप्राप्तीस्तव

वेडे झालेल्या, ब्रह्मनिष्ठ हंसराजस्वामींनी केलेली ही विस्तृत मार्मिक टीका श्रीसमर्थ भक्तांच्या सेवेस सादर करण्याचा योग, सत्कार्योत्तेजक सभेच्या संग्रहीची ही टीका प्रकाशित करण्यास संमती दिली, हे सत्कार्योत्तेजक सभा व श्री समर्थ वाग्देवता मंदिर या दोन्ही संस्थांचे वाचकांवर उपकार आहेत.

**॥ श्रीराम समर्थ ॥**

**जय जय जी सद्गुरु गोसावी। मज जें जें आठवेल जीवीं ॥ तें तें पुसेन,फेडावी । आशंका माझी ॥ १ ॥**

**शिष्य बोले लडिवाळपणें । म्या संसार घेतला कोण्या गुणें । मज हें दुःख भोगणें । किंनिमित्य घडलें ॥ २ ॥**

**विषयलोभें, भगवंता । नेणोनि, जालासी दुश्चिता । तेणें गुणें मागुता । आलासी जन्मा ॥ ३ ॥**

**तरी हा जन्म कैसा तुटे। मज भगवंत कैसा भेटे । भवसागरू वोहटे । कोण्या गुणें दातारा ॥४ ॥**

**टीका** - माझा जन्म कधी तुटेल? मज भगवंत कधी भेटेल? आणि हा भवसागर कधी निमेल ? हा अभिप्राय शिष्याचा ध्यानात आणून, हेतुहेतुमद्भावरूपें तिहीं वचनांचें ती (तीन) प्रकारेंच (स्वामी) उत्तर देते जाले. (झाले)

***जन्म तुटे संतसंगें। देव भेटे अंतरंगें ।**
**दृढ भक्तीचेनि योगें। भवसिंधु आटे ॥५ ॥***

**टीका** - जैसा प्रश्न येकरूप असून ति (तीन) प्रकारें केला, तैसाचि उपायही येकरूपचि असून ति(तीन) प्रकारे बोलतात, की जन्म संतसंगें तुटेल. जन्म-मृत्यू येकरूप म्हणून मृत्यूचें नाव घेतलें नाहीं. तस्मात् सत्संगांवाचून अन्य साधनें (साधनांनीं) जन्म-मृत्यू तुटणार नाहीं. तरी सत्संग करावा.

देव अंतरंगें भेटे. भेटे म्हणजे अपरोक्षत्वें साक्षात्कार, जे आपणचि भगवंत व्हावे. केवळ भेटे म्हणून दृष्टिगोचर नव्हे. याजकरिताच पूर्वी भगवंत न जाणून ऐसे बोलिले. तस्मात् जाणावा भगवान. दृष्टिगोचर असतां जाणण्याचे प्रयोजन काय? म्हणून दृष्टिगोचर- दर्शनासी योग्य नव्हे. त्यास जाणून तेचि व्हावे. हाचि साक्षात्कार, हेचि भेटी. याचा उपाय अंतरंगे.

प्रया(मा)णांदि महत्प्रयासें होणार नाही. तरी अंतरंगेंचि, म्हणिजे श्रवण, मनन, निदिध्यास येणे कडुनचि प्राप्ती. तरी श्रवण, मनन करावें. श्रवण म्हणजे सद्गुरुमुखे, मी कोण, देव कोण, हे निःसंशयपणे ऐकून, "मी ब्रह्म" हा निश्चय व्हावा. मनन म्हणजे कांहीं कुतर्क येतील, त्यास दंडून विचारें ब्रह्मचि व्हावें. निदिध्यास म्हणजे एकतान अनुसंधान. हाचि अंतरंग.

दृढ भक्तीनें भवसिंधू आटे. भक्ती म्हणजे ऐक्यता. ध्येय-ध्याता, साध्य-साधकता, उपास्य-उपासक यांस अणुमात्र भिन्नता नसावी. भवसिंधू म्हणजे भेदबुद्धी. तूं, मी, हा, इत्यादी भेदबुद्धीचें हनन दृढभक्तीच करील. तरी अभिन्नपणें ऐक्यता व्हावी. इतुका अभिप्राय.

हे (सर्व) शिष्य अंतरीं समजून दृढभक्तीच्या उपायाचा प्रश्न करिता झाला.

**दृढभक्ती करू कैसी । काय धरावें मानसीं । सांगा स्वामी अज्ञानासी । मार्ग कांहीं ॥ ६ ॥**

**टीका** - हे महाराज, हे सद्गुरु मज अज्ञाना (न्या) स मार्ग दाखवावा. जे मी दृढ भक्ती कैसी करू. या भक्तीचे प्राप्तीस अंतःकरण काय धरू? हे कृपा करून सांगावें. प्रार्थना ऐकून, दृढभक्ती करू कैसी, ऐसा प्रश्न. परी प्रस्तुत दृढभक्तीचे निरूपण उतिष्टणार नाही (ठसणार नाही) म्हणून त्या भक्तीचे प्राप्तीचा उपाय, साधनात्मक, सद्गुरुनाथ प्रतिवचन देतात.

....क्रमशः

**– डॉ. धीरज सर्वज्ञ**



# मनोगत

**||ॐ श्रीकृष्ण: शरणं मम: ||**
**||श्री तुळजाई प्रसन्न ||**

मन एक अगम्य गुहा. कोणाच्याही मनात शिरणं फारच कठीण ! कशाला बाकीचं... आपल्या मनाचाच आपल्याला पत्ता नसतो !! खोलवर काय दडलं आहे आणि कधी वर काय उफाळून येईल !! साध्या घरगुती प्रसंगातही माणूस सहज बोलतो, 'माझ्या मनाला पटलं तर करीन !'. असं हे मन लहान खोडसाळ मुला सारखं इकडून तिकडे पळत असतं. त्याला एकाजागी बांधून ठेवणे कठीणच !

पण या मनाचा अभ्यास मात्र सर्वत्र होताना दिसत आहे. अतिशय तीक्ष्ण बुद्धी आणि ज्ञानावरही हे मन कुरघोडी करतं. एकदा का ते पेटून उठलं की त्याच्या समोर कोणाचेच काही चालत नाही. कुठे असतं हे 'मन' ! देहामध्ये त्याची जागा कुठे आहे? हृदयाची सर्जरी करताना डॉक्टरांना कधी दिसले आहे का हो ते ? याचं उत्तर नक्कीच "नाही" असं आहे.

भगवद् गीतेत भगवंतानी म्हटले आहे 'काम एष क्रोध एष ..काम-क्रोधाचे अधिष्ठान मन आहे. इंद्रियेभ्यः परं मनः: ...इंद्रियांहून मन श्रेष्ठ आहे. म्हणून मनावर काम केल्याशिवाय केवळ अध्यात्मिकच नाही तर कोणतेही उचित साधणार नाही. तिस ऱ्या अध्यायात हे सांगितले तर सहाव्या अध्यायात भगवान म्हणतात: 'मनसा इंद्रियं ग्रामं विनियम्य.' 'आत्मसंस्थं मन: कृत्वा..' अशा रीतीने मनाची चंचल अस्थिर स्थिती नष्ट होत "योगी प्रशांत मनसं"..उत्तम सुख प्राप्त करतो. पुढे याच अध्यायात अर्जुन विचारतो, **"चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम्"** । तो म्हणतो वायूप्रमाणे चंचल मनाचा निग्रह साध्य होणे मला कठीण वाटते. लागलीच भगवान म्हणतात: मनो दुर्निग्रहं चलं..हे खरे आहे, पण वैराग्याने आणि अभ्यासाने हे साध्य होऊ शकते. पुढे बाराव्या अध्यायातील आठव्या श्लोकात 'मय्येव मन आधत्स्व' सांगत भगवंतानी स्थितप्रज्ञ स्थिती सांगितली आहे.

मनावर काम करणे किती आवश्यक आहे ते संपूर्ण गीतेत सांगितले गेले आहे. तसेच आद्य शंकराचार्य, ऋषीमुनी इत्यादि पूर्वसुरीनी हेच स्पष्टपणे सांगितले आहे की 'मन एवं मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो:'. गीतेच्या १८व्या अध्यायात भगवंतानी स्पष्ट म्हटले आहे की इंद्रीयाणां मन:चास्मि" इंद्रियांमध्ये मन माझी विभूती आहे.

जन्मल्यापासून ते मृत्युपर्यंत मनच माणसाला जीवनदर्शन घडवते. बुद्धीलाही नाचवते. साहित्यिक विश्वातही मनावर खूप बोलले गेले आहे. 'मन मनास उमगत नाही !' 'मन शुद्ध तुझं गोष्ट हाय पृथ्वी मोलाची !' 'आम्ही वळखलं ग वळखलं मनची खुण' ' मन पापी भुला', ' मन रामरंगी रंगले..' इत्यादि इत्यादि. प्रेमीजनांच्या भावविश्वातील भावगीते तर असंख्य !! परंतु गंमत अशी की मन या शब्दाचा मूळ शब्द मनस आहे आणि तो संस्कृत व्याकरणात नपुंसक लिंगी आहे. आहे ना विशेष ? म्हणजे एक क्षणभरही एका जागी न बसणारे, शांत न राहणारे, थोरामोठ्या महानुभावांना स्वत:च्या मागे धावायला, कष्ट करायला लावणारे हे मनस नपुंसक लिंगी शब्द आहे.

या मनावर आपल्या संत महात्म्यांनीही खूप काम केले आहे. संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आदींनी मनाशी हितगुज केले आहे. समर्थ रामदास स्वामींनी तर दासबोधात मनाला समज दिली आहे. २०५ श्लोकांच्या छोट्या मानस शास्त्रीय मनोबोध ग्रंथात मनाला जबरदस्त बोध केला आहे. त्यातील प्रत्येक श्लोकाचा चांगला अभ्यास केला आणि तो बोध बुद्धीपूर्वक खोलवर मनात रुजवला तर प्रत्येक माणसाचे जीवन कुठल्या कुठे श्रेष्ठ स्तरावर जाईल !!

पण लक्षात कोण घेतो ? सामान्य माणूस, खा-प्या-मजा करा असे पशूवत जीवन जगण्यातच धन्यता मानतो. मनुष्य जन्म मिळाला आहे तर त्याचा उत्कर्ष कसा होईल यासाठी प्रयत्नरत राहिले पाहिजे हे याच्या गावीही नाही. अशा वेळी वाटतं देवा तू दिलेली मन:शक्ती आम्ही किती वाया घालवत आहोत !! तुझ्याकडे भौतिक जीवन, भौतिक संसार, वस्तू मागण्या पलीकडे आम्ही कसलाही विचार करत नाही. तू आम्हाला काय काय दिले आहेस याचा कधीही हिशेब ठेवत नाही. दोन डोळे, कान, घ्राणेंद्रिये, हात-पाय, बुद्धी..सगळे शरीरच सुदृढ दिले आहेस. म्हणून आम्ही सुंदर जीवन जगतो. पण खरे जीवन सौंदर्य या सर्व गोष्टींचा उपयोग तुला प्राप्त करून घ्यायला, करायला हवा हे कोणाच्याही कधी ध्यानी येत नाही. देवा आम्हाला क्षमा कर !! योग्य वाटेवर आम्हाला पोहचू दे.

आम्ही फक्त तक्रार करतो. आलेल्या अडचणी आणि दु:खाचा विचार करत रडत बसतो. यापेक्षा समर्थांनी केलेल्या मनोबोधाचा आधार घेतला तर ? म्हणून या लेखात

आपण त्यातील एकाच श्लोकाचा मागोवा घेऊ या.

**जनीं सर्व सुखी असा कोण आहे। विचारें मना तूची शोधुन पाहे॥**
**मना त्वांचि रे पूर्व संचीत केले। तया सारखे भोगणें प्राप्त जाले॥११॥**

सामान्यपणे आपल्या जवळ जे नाही त्याचीच आपण तक्रार करतो आणि दुःख करत बसतो. समर्थ आईच्या मायेने आपल्याला समजावतात: अरे बाळा, या जगात संपूर्ण सुखी असा कोण सापडेल का ? विचार कर आणि तूच शोधून पाहा. इथे समर्थांचे समाज निरीक्षण, चिंतन दिसून येते. या प्रश्नाचं उत्तर दुस-या ओळीत पुढे तेच देतात "**विचारें मना..**" जो विचारी आहे, शास्त्रांचा अभ्यास करून त्याप्रमाणे जीवन जगतो आहे, तोच सुखी आहे. मना विचार कर, शास्त्राभ्यास कर आणि शोध घे. तुला विचारी माणसेच फक्त सुखी असलेली दिसतील. अर्थात शास्त्राभ्यासामुळे सुख म्हणजे काय त्यांना कळलेलं असतं. त्यामुळे ते सुखी, स्वस्थ असतात.

समर्थांनी पुढच्या दोन ओळीत पित्याप्रमाणे मनाला दटावलं आहे. रे मना, रे माणसा, तुझ्या पूर्व संचिताप्रमाणे आता तुला ते भोगणे प्राप्त झाले आहे.

प्रारब्ध, संचित आणि क्रियमाण असे कर्माचे प्रकार आहेत. पूर्वजन्मी किंवा पूर्वार्धात जी जी कर्मे तू केलीस त्याचेच फळ आज तुला भोगावे लागत आहे. अशी एक चापटही हळुवारपणे समर्थांनी मारली आहे आणि दाखवून दिले की आत्मपरीक्षण कर की तुझे कुठले कर्म आड येतेय ते ! तू काय केलं पाहिजेस म्हणजे तुला सुखप्राप्ती होईल याचा विचार कर. त्याप्रमाणे जीवनाचा पाया रच. भ्रमरा प्रमाणे फुलपाखरा प्रमाणे किती फुला-फळांवर अर्थात या ना त्या विषयांमागे फिरत राहशील? विचार कर !! भ्रमर, फुलपाखरे विविध फुला-फळांवर गेले तरी त्यांचे कामच करतात. त्यांच्या पायाला परागकण चिकटतात. त्याचा दुस-या परागांशी संयोग होऊन नवीन फुले-फळे निर्माण होतात. पण विषयांच्या मागे लागून माणसाला काय साध्य होते ? केवळ आत्मघात ! ही सर्व संतमंडळी आपल्याला चांगले ते काय हे कळकळीने दाखवतात. पण आपले प्रारब्ध !!

असो. सदैव संतसंगती घडो अशी भगवंताशी प्रार्थना करून थांबते.

**– आसावरी**
मुंबई

# मानवाचे परमकर्तव्य

**श्री समर्थ सिद्धरामेश्वर महाराज की जय**
**श्री समर्थ निसर्गदत्त महाराज की जय**
**||श्री समर्थ गणपतराव महाराज की जय||**

मानवाचे परम कर्तव्य आत्मज्ञान प्राप्त करणे आहे. गीतेमध्ये श्रीकृष्णाने सांगितले आहे की 'आत्मज्ञानेवीण पार्थ सर्व कर्म निरर्थकम्.' जगामध्ये तीन गोष्टी अति दुर्लभ आहे १) मनुष्यत्वम २) मुमुक्षत्वम ३) महापुरुष संश्रेय: हे तिन्ही प्राप्त होऊन आत्मज्ञान करून घेतले नाही आणि जीवनमुक्ती प्राप्त करून घेतली नाही तर आत्महत्या केल्यासारखे आहे. श्री. समर्थ रामदास स्वामींनी दासबोध दशक आठ (ज्ञान दशक ) समास आठ (आत्मदर्शन) ह्याच विषयावर विवरण केले आहे.

परमार्थाचा मुख्य उद्देश आत्मदर्शन घडावे हा आहे आणि स्वतः आत्मस्वरूपच व्हावे. दर्शन म्हणजे प्रत्यक्ष भेट. समर्थ रामदास स्वामींनी फार विस्तार करून हा विषय समजावला आहे की परमात्मा तो तूच आहेस, तया परमात्म्याचे लक्षण ऐसे असे ll जन्म नाही, मृत्यू नाही, येणे नाही, जाणे नाही, बद्ध-मोक्ष दोन्ही नाही तया परमात्म्याशी. परमात्मा निर्गुण निराकार, परमात्मा नित्य निरंतर, परमात्मा अनंत अपार, परमात्म्याचा विवेक अतर्क्य आहे. श्री समर्थ रामदासांना, तूच स्वतः परमात्मा आहेस हा बोध अंतकरणात उतरवायचा आहे. त्यामुळे अखंड समाधान, परिपूर्ण शांती, आणि अविरत आनंद प्राप्त होतो.

खरा परमात्मा म्हणजे कोण? जो देश, काल, वस्तू, परिच्छेद रहित आहे आणि अखंड आहे, अद्वय आहे, सर्वाधार आहे, पण स्वतः निराधार आहे, निर्लेप आहे, नित्य-नूतन आहे. परमात्मा तूच स्वतः आहेस, हे पटवून देतात.

पंचमहाभूतां मध्ये श्रेष्ठ आणि अत्यंत विशाल आकाश आहे. म्हणून आत्म्याला गगन सदृश्यम अशी उपमा देतात पण ते योग्य होत नाही. का म्हणजे आकाश याचा अर्थ

अवकाश किंवा पोकळी अथवा शून्य अस अर्थ होतो. पण आत्मा शून्य किंवा पोकळी नाही, आणि तो परिपूर्ण आहे. त्याला उपमाच देता येत नाही. कारण त्याच्यासारखे दुसरे काही नाही. म्हणून ते अनुपमेय आहे. ते अदृश्य आहे, अगोचर आहे, अव्यक्त आणि गुप्त आहे, म्हणून समर्थांनी सांगितले आहे की गुप्त तेची प्रगटवावे, असाध्य तेची साधावे, कानडेंची अभ्यासावे, सावकाश.

ह्यासाठी श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ सद्गुरुला अनन्यशरण जाऊन त्यांचा बोध लक्ष देऊन ऐकावा. कारण, सद्गुरूबोध हृदयी धरी तोच मोक्षाचा अधिकारी, सद्गुरुला (सत्य वस्तू दाखवि तो सद्गुरु) शरण गेल्याशिवाय  तरणोपाय नाही, म्हणून सद्गुरुचे पाय धरावे आधी आधी, आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे साधन करावे.

साधनांमध्ये दोन प्रकार आहेत (१) परंपरा साधन (ह्याला पिपलीका मार्ग म्हणतात) हा मार्ग अतिशय मंद गतीचा( मुंगीच्या गती प्रमाणे) आहे, ह्या मार्गाने आत्मसाक्षात्कार लवकर होत नाही. म्हणून दुसरा मार्ग प्रत्यक्ष साधन किंवा विहंगम (पक्षी आकाशात झेप घेतो तसा) मार्ग आहे. ह्यात चार पायऱ्या आहेत, त्या म्हणजे :श्रवण-मनन-निजध्यास आणि साक्षात्कार. ह्यालाच साधनचतुष्ट म्हणतात. पहिली तीन 'साधने' आहेत, चौथे 'साध्य' आहे. हा मार्ग तीव्र गतीचा आहे आणि म्हणून ह्या मार्गाने गेलात तर आत्मसाक्षात्कार लवकरात लवकर प्राप्त होतो.

याच प्रमाणे सर्व देव नमस्कारं केशवम प्रति गच्छती; अर्थात सर्वांमध्ये एकच ब्रह्म असल्यामुळे आपणही ब्रह्म (आत्मा) आहोत. म्हणून सगळ्यांमध्ये परमात्म्याला शोधण्यापेक्षा स्वतःमध्ये शोधणे सोपे. पण हे कठीण का झाले? येथे शोधणारा वेगळा होऊन आत्मस्वरूप शोधण्याचा प्रयत्न करतो, त्यामुळे ते असाध्य झालंय. आत्मा त्रिपुटीरहित असल्याने, ह्या माध्यमातून  शोधले तर प्राप्त होत नाही. शोधणारा( जीवनिश्चय, मीपणा, अज्ञान, अहंकार)जोपर्यंत आहे तोपर्यंत आत्मा  आपणच स्वतःच आहोत हा निश्चय होत नाही. आत्मा हा त्रिपुटी विरहित आहे (आत्मा, आत्म्याला जाणणारा, जाणण्याची क्रिया, असे तीन नाही) म्हणून जाणणारा जोपर्यंत आहे तोपर्यंत आत्मसाक्षात्कार होत नाही. 'आपणास निवेदती ऐसे भक्त थोडे असती', त्या भक्तांना आत्मसाक्षात्कार लवकर होतो.

यासाठी आधी पाहवे मी कोण, मग परमात्मा निर्गुण तो ओळखावा. देव-भक्त एकच आहेत. म्हणजे विभक्त नाही तो भक्त. विभक्तपणे देवभक्त हे एक होऊ शकत नाही. देवा-भक्ताचे मूळ शोधल्यास देव व भक्त एकच आहे असे निदर्शनास येते. ह्यालाच आत्मनिवेदन भक्ती म्हणतात.

नवविधा भक्ती मध्ये आत्मनिवेदन भक्ती ही श्रेष्ठ आणि निर्गुण भक्ती आहे. या भक्तीने सायोज्य मुक्ती प्राप्त होते. एकूण चार मुक्ती मधील सलोकता, समीपता, आणि स्वरूपता, या तिन्ही नाशवंत आहेत, पण चौथी सायोज्यता मुक्ती मात्र शाश्वत आहे. त्यायोगे मन उन्मन पावते आणि मनुष्य जन्म-मृत्यूच्या फेऱ्यापासुन मुक्ती पावतो. त्याद्वारे तो सच्चिदानंदरूपच (परब्रम्हच)होतो.

**– अनंत कल्याणराव कुलकर्णी**

पुणे

*(श्री समर्थ गणपतराव महाराज शांती कुटीर कन्नुर यांचे शिष्य)*

"देव कोण आहे आणि तो कसा दिसतो?" हा प्रश्न विचारणारे ज्ञानच स्वतः देव आहे! सर्वसाधारणपणे ज्या अदृश्य शक्तीला देव म्हणून मानले जाते ते ज्ञानच तुम्ही स्वतः आहात. ज्ञानच देव आहे. देव म्हणजे आपले स्वरूप...सेल्फ.

– श्री निसर्गदत्त महाराज

# श्री दासबोधातील सख्य भक्ती

नवविधा भक्ती मधील सख्यभक्ती हा विषय पाहताना समर्थांनी दासबोधात प्रथम भक्ती म्हणजे काय याचे कसे प्रतिपादन केले आहे ते पाहू. पहिल्या समासातच समर्थ म्हणतात:

**ग्रंथा नाम दासबोध | गुरू शिष्यांचा संवाद | येथ बोलीला विशद | भक्तीमार्ग ||**

भक्ती म्हणजे काय? पूज्य के.व्ही बेलसरे यांनी दासबोध स्पष्टीकरणात छान सांगितले आहे...भज सेवायाम्..भगवंताची सेवा करणे म्हणजे भक्ती ! ज्या भगवंताची ही सेवा करायची त्या बद्दल मनात निरंतर शुद्ध प्रेम,आस्था हवी. भक्ती ही स्वभावत:च प्रेमरूप आहे. नारदमुनींनी पण भक्तीसूत्रात म्हटले आहे की परमात्म्याच्या ठिकाणी परम प्रेम म्हणजे भक्ती.

समर्थांच्या वांग्मयाचे वैशिष्ट्य असे आहे की त्यांना जेवढी भक्ती प्रिय होती तेवढीच त्यातील बुद्धी आणि शक्तीही प्रिय होती. विवेक आणि विचार हा तर त्यांचा श्वासच होता. त्यामुळे त्यांची भक्ती डोळस होती. अंधश्रद्धा, बावळटपणा, भाबडेपणा ,भोळाभाव हा त्यांना मान्यच नव्हता. 'विवेकासहित भक्ती' त्यांना प्रिय होती. भगवंतासाठी मन द्रवणे, विरहात व्याकुळ होणे, मनाची तगमग होणे आणि भावांत भेटला की त्याच्या ऐक्याचा आत्मानंद भोगणे अशा ख-या भक्तीच्या अनेक अवस्था आहेत. ज्याचा जसा भाव असेल तसा त्याला देव प्राप्त होणार. 'भावेची पाविजे देव' हा समर्थांचा महत्त्वाचा सिद्धांत आहे.

दासबोधातील चौथा दशक केवळ नवविधा भक्तीवर आहे. श्रवणं, किर्तनंम, विष्णोस्मरणं, पादसेवनं, अर्चनं, वंदनं, दास्यं ,सख्यम, आत्मनिवेदनं ..प्रत्येक भक्तीची नेटकी व्याख्या समर्थांनी दासबोधात केली आहे. प्रत्येक भक्तीचा समास म्हणजे एकेक प्रबंधच आहे ! एवढे भक्तीचे विस्तृत वर्णन आश्चर्यचकित करते. समर्थांच्या

भक्ती निरूपणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सर्वच संत हे भक्तीबद्दल बोलताना पारमार्थिक स्तरावर बोललात, पण समर्थांचे निरुपण काहीसे वेगळे आहे.

भक्तीयोगाचे आचरण करताना प्रत्येकाला व्यावहारिक स्तराकडून पारमार्थिक स्तराकडे झेपावायचे असते. हा प्रवास महाकठीण असतो परंतु त्याचे सूक्ष्म पदर समर्थांनी फार सुंदर रीतीने उलगडवून दाखविले आहेत. दासबोधाचा दशक चार, समास आठ मध्ये सख्य भक्तीचे बत्तीस ओव्यांमध्ये वर्णन केले आहे. समर्थ म्हणतात:

**देवासी परम सख्य करावे | प्रेम प्रीतीने बांधावे | आठवे भक्तीचे जाणावे | लक्षण ऐसे ||**

सख्य म्हणजे प्रेम. सखा म्हणजे मित्र, जो अगदी जीवाच्या जवळ राहतो. असा जिवलग मित्र म्हणजेच सखा. ज्या प्रमाणे प्रत्येक माणसाला आपला अगदी जवळचा खास मित्र असतो, त्याच्यापाशी आपण अगदी आतल्या, मनातल्या गुजगोष्टी मोकळेपणाने सांगतो. ज्याच्यावर आपला पूर्ण विश्वास असतो. जे दुस-या कोणालाही सांगितले जात नाही, पण त्या जिवलग मित्राला सांगतो. अशी हमखास विश्वासाची एकमेव जागा म्हणजे सखा, मित्र. हे जसे व्यवहारात आपण पाहतो, तसेच परमार्थातही असते. भक्त आणि भगवंत यांच्यातील सख्यत्व भाव, प्रेम हे अवर्णनीय असते. तेथे द्वैताचा एक कणही शिल्लक राहत नाही. संपूर्ण जीवन भगवंताला अर्पण करणे, शरणागती स्वीकारणे. आता जे काही माझे आहे, 'ते सर्व तुझेच' ही भावना दृढ असणे म्हणजे सख्य ! जशी नदी समुद्राला मिळाल्यानंतर तिचे स्वतंत्र अस्तित्व शिल्लकच राहत नाही, तसा भक्त भगवंतामध्ये विरघळून जातो. तो सखा भगवंतही भक्ताच्या प्रेमाने बांधला जातो. अन्यथा त्याला कशानेही बांधता येणार नाही. सख्यभक्ती मध्ये देव आणि भक्त याचे नाते अगदी आगळेच असते. भगवंत हा कृपेचा वर्षाव करणारा कृपासिंधु, करूणासिंधू आहे. म्हणून भक्तानेही आपले अंत:करण भगवंतापुढे उघडे करावे. भगवंताचा मंगलमय मित्रपणा, सखेपणा, याचा मधुर संगम सख्य भक्ती मध्ये अनुभवास येतो.

अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असा की भगवंताची जी इच्छा; तोच धर्म, तेच सद्शास्त्र, तेच कर्तव्य, आणि तोच व्यवहार होतो. अशा भक्ताजवळ कधीही लोभ, द्वेष, मत्सर असे विकार राहत नाहीत. देहसुखाबद्दलची अत्यंत विरक्ती. प्राणिमात्रांबद्दलची अत्यंत करुणा, भगवंतावरील अतूट प्रेम, असे हे सख्य भक्तीचे प्रधान गुणधर्म आहेत.

अशा भक्ताने सख्य टिकविण्यासाठी काय काय करावे हे सांगताना श्री समर्थ म्हणतात:

**भक्ती भाव आणि भजन | निरुपण आणि कथा किर्तन |प्रेमळ भक्ताचे गायन | आवडे देवा || आपण तैसेची वर्तावे | आपणासी तेचि आवडावे | मनासारिखे होता स्वभावे | सख्य घडे नेमस्त ||**

भगवंत सखा असणा-या भक्तांनी सदा सर्वकाळ भगवंताचे भजन भक्तीभावाने करावे. सत्संगती धरावी. जाणत्या संतांकडे साधना करावी. अभ्यास करावा. जेथे जाऊ तेथे निरुपणातून, कथा-किर्तनातून, संगीतातून भगवंताचे गुणगान लोकांपर्यंत पोहोचवावेत. हे केव्हा जमेल? तर तेव्हा आपण तन-मन-धनाने भगवंताचे होऊ ! त्याच्या गुण-रूप-लिला बद्दलच भजन, चिंतन, निदिध्यास आपल्याला लागेल, तेव्हाच हे सख्य घडेल.

**देवाच्या सख्यत्वा कारणे |आपले सौख्य सोडून देणे | भजन भावे जीव प्राणे | शरीर तेही वेचावे ||(४/८/६)**

व्यवहारात आपण सामान्य भक्त विषय-वासनेच्या विकारात तुडुंब भरलेले आहोत. स्वार्थ, अहंकार, ममता, मत्सर यांनी व्यापलेले आहोत. देहबुद्धीवर जगणे हेच आपले कर्तव्य आहे असे आपण समजतो. पण देवाचे सख्य हवे असेल तर ते इतके सोपे नाही. त्यासाठी त्याग, भगवंतावर अनन्य प्रेम, शरणागत. आपले व्यवहारातील स्वार्थी प्रेम, अहंकार याचा संपूर्ण त्याग, वेळ पडली तर भगवंताला प्राप्त करण्यासाठी जीवावर उदार होणे, हे सर्व जमेल तेव्हाच सख्य भक्ती प्राप्त होते.

**देवाच्या सख्यत्वा साठी | पडाव्या जीवलगांशी तुटी| सर्व अर्पावे, सेवटी | प्राण तोही वेचावा || आपुले आवघेची जावे | परी देवासी सख्य राहावे| ऐसी प्रीती जीवेभावे | भगवंती लागावी || देव म्हणजे आपुला प्राण | प्राणासी न करावे निर्वाण ||परम प्रीतीचे लक्षण | ते हे ऐसे असे ||(द४./८/९/१०)**

देवासी सख्य प्राप्त होण्यासाठी जे आपले जिवलग म्हणजे काम, क्रोध, दंभ, शोक, अहंकार यांच्याशी फारकत घेऊन, तसेच आपले सौख्य म्हणजे विश्रांती, आळस, आराम, निद्रा या सर्वांचा त्याग करून शरीर कष्टविणे, त्यामध्ये जीवाची पर्वा न करता प्राण अर्पण करणे, तसेच आपले श्वासही सूक्ष्मतर सूक्ष्मतम करणे. देव म्हणजे आपला प्राणच आहे. हे समजून भक्ती करणे हेच भगवंताच्या परम प्रीतीचे लक्षण आहे.

समर्थ पुढे म्हणतात की असे भगवंताशी भक्ताचे सख्य जोडले गेले तर देवालाही

भक्ताची चिंता राहते. **आपण असता अनन्य भावे | देव तात्काळची पावे |**..भगवंत एवढा दयाळू -मायाळू आहे. भक्त एक पाऊल पुढे आला तर भगवंत दोन पावले पुढे येतो. तात्काळ पावतो. त्याची असंख्य उदाहरणे आपल्याला दिसतात. मित्रभाव, वात्सल्य भाव, भक्तीभाव..दास्यभक्तीतून सिद्ध झालेला सख्यभाव असे अनेक भाव भक्तीत रंगून गेले आहेत.

**मित्रभाव:** रामायणात सुग्रीव आणि श्रीराम, केवट आणि श्रीराम यांचे सख्य रमणीय आहे. सीतेचा शोध घेण्यासाठी श्री राम सुग्रीवाकडे आले. त्यांची मैत्री जमली. तेव्हा प्रथम  श्रीरामाने सुग्रीवासाठी वालीचा वध केला. त्याला राज्यावर बसविले. धर्मराज्य स्थापून दिले. त्या नंतर सुग्रीवानेही श्रीरामाची साथ सोडली नाही. राम-रावण युद्धात जीवावर उदार होऊन रामासाठी सुग्रीव लढला. इतकेच नाही तर अयोध्येत राज्याभिषेकासाठी तो खांद्याला खांदा देऊन उभा होता. सख्यभक्ती !!!

केवट हा साधा नावाडी. श्रीराम-सीता-लक्ष्मण यांना वनवासात जाण्यासाठी गंगा पार करून देण्यासाठी आपल्या नावेतून तो घेऊन गेला. त्याची श्रीरामावर एवढी प्रिती, प्रेम, की त्याने काहीही पैसे स्विकारले  नाहीत. तो म्हणाला आपण दोघे मित्र आहोत. नदी पार करून मी लोकांना पैलतीराला नेतो, तू भवसागर पार करून लोकांना मोक्ष मिळवून देतोस. मित्राने मित्राकडून काही घ्यायचे कां ? साधा सामान्य केवट आणि अवतारी श्रीराम...पण मित्रत्वाचे नाते इतके घट्ट की 'मी आणि तू 'वेगळे नाहीच ही त्याची भावना. केवढी विलक्षण सख्यभक्ती !!

महाभारतात श्रीकृष्ण-अर्जुन यांची सख्यभक्ती हा सर्वत्रच दाखला दिला जातो. अर्जुन  कृष्णाला सखाच म्हणत असे. युद्धाच्या वेळी दुर्योधनाने भगवंताकडे सैन्य मागितले. अर्जुनाला श्रीकृष्ण मिळाला म्हणून परमानंद झाला. अर्जुनाची श्रीकृष्णावरील श्रद्धा, निष्ठा विश्वास अवर्णनीय होता. हे खरे प्रेम पाहून श्रीकृष्णाने आपल्या भक्ताच्या रक्षणासाठी अर्जुनाच्या रथाचे सारथ्य केले. आयुष्यभर पांडवांच्या सुखासाठी त्यांच्या पाठीशी श्रीकृष्ण खंबीरपणे उभे राहिले.

श्रीकृष्ण-सुदामा हेही मैत्रीचे, सख्यत्वाचे उदाहरण. सुदामा भेटायला आल्यावर राजा असणारा श्रीकृष्ण धावत दारापर्यंत गेला. त्याची आठ दिवस सेवा केली. त्याच्या पुरचुंडीतील  पोहे आवडीने खाल्ले. सुदामा घरी पोहोचायच्या आत त्याची नगरी श्रीमंत करून टाकली. किती टोकाचा मित्रत्व भाव, सख्यत्व भाव !!

**वात्सल्यभाव:** श्रीकृष्ण आणि यशोदा. परब्रह्म रुपी श्रीकृष्णाला यशोदेने अज्ञानापोटी मायेने प्राणपणे वाढविले. तिच्या निर्व्याज प्रेमाचा परमानंद श्रीकृष्ण

परमात्मा घेत होते. सख्य भक्तीचा हा किती गोड, अवीट भाव !!

**मधुरा भाव:** मीराबाई-श्रीकृष्ण. लहानपणी मैत्रिणीचे लग्न झाले. तिला नवरा बघितला. आईला सहज विचारले, माझा नवरा कुठे आहे ? तेवढ्यात एक संन्यासी आला. त्याने मीराबाईला श्रीकृष्णाची मूर्ती दिली. तिला वाटले हाच माझा नवरा. तेव्हापासून मीराबाईनी श्रीकृष्णाला सर्वस्व मानले. आई, सासू यांनी तिला समजावले. सासरच्यांनी आणि समाजाने विषाचा प्याला पण दिला. मीराबाईने सर्व सोसले. पण 'मेरे तो गिरिधर गोपाल दुसरा ना कोई...'यावर आयुष्यभर ती ठाम राहिली. हा सख्य भाव !!!

**भक्तीभाव:** श्री समर्थ-कल्याणस्वामी. श्री समर्थ-वेण्णास्वामी. कल्याण हा परम शिष्य होता. 'कल्याणा छाटी उडाली रे'...हे पूर्ण व्हायच्या आत त्याने गडावरून उडी मारली. अर्थातच समर्थांनी त्याला अलगद उचलून घेतले. पण गडावरील इतर शिष्यांना दाखवून दिले की असे सख्य, असे प्रेम, असले पाहिजे.

वेण्णास्वामिना समाजाने विष पाजले. तेव्हा पित्याप्रमाणे समर्थांनी वेण्णास्वामिना आपले केले. वेण्णास्वामींचा समर्थांवर एवढा भक्तीभाव अढळ होता की शेवटी किर्तन करता करता समर्थांच्या पायावर कोसळून त्यांनी प्राण त्याग केला. अढळ सख्यभाव !!

जनाबाई-विठ्ठल. नामदेवांकडे ती दासी म्हणून ओळखली जाणारी, तिला आधार पांडुरंगाचा. विठ्ठलरूप झालेली जनाबाई काबाडकष्ट करतानाही विठ्ठलमय झाली होती. तिची अपार भक्ती बघून पांडुरंगही तिचा आधारवड ठरला. विठ्ठल आणि जनाबाई एकरूप झाले.

श्रीकृष्ण आणि गोपी-गोप, श्रीकृष्ण आणि उद्धव यांचा सख्यभाव. परमात्मा परमेश्वर असलेला श्रीकृष्ण गोप-गोपींच्या प्रेमात रंगून गेला होता. गोप-गोपिकांचे प्रेम विलक्षण होते. श्रीकृष्ण आठव्या वर्षी मथुरा सोडून गेला. त्यानंतर तो मथुरेत पुन्हा कधीही परतला नाही. पण तरी सुद्धा एक क्षणही गोपी श्रीकृष्णाला विसरल्या नव्हत्या की एक कणही श्रीकृष्णावरील त्यांचे प्रेम हलले नाही. श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला, पण त्याचे अखंड प्रेम गोप-गोपीना मिळाले. असे सख्यभक्तीचे लक्षण दुसरे कुठे पाहयला मिळत नाही.

श्रीकृष्णाचा उद्धव सुद्धा लाडका ज्ञानी भक्त. पण श्रीकृष्णाजवळ अति अनन्य समर्पण भाव त्याचा कायम होता.

प्रेमाचे उच्चतम स्वरूप म्हणजे दास्यभक्तीचे सिद्ध सख्यभक्ती मध्ये रुपांतर! म्हणजे श्रीराम आणि मारुतीराय! संपूर्ण जीवन राममय. जगणे, बोलणे, चालणे आचरण हे फक्त आणि फक्त श्री रामासाठीच. एका श्लोकात असे म्हटले आहे की

मारुतीराय श्रीरामाला म्हणतात 'हे रामा, प्रथम मी तुझा भक्त आहे, तुझा मी दास आहे. पण आता मला वाटतेय आत्मदृष्टीने तू आणि मी एकच आहोत.' श्रीराम हाच श्वास, हाच प्राण इतका सख्यभाव.

तोच समर्थ आणि श्रीरामामध्ये होता. आठव्या वर्षी घरदार, सगे-सोयरे सोडून श्री रामासाठी धावलेले आणि आयुष्यभर फक्त आणि फक्त रामरायाच्या नामाचा डंका वाजविणारे, राममय झालेले समर्थ रामदास स्वामी ही सख्य भक्तीची टोकाची उदाहरणे आहेत.

जशी भगवंतावर सख्यभक्ती, तशीच देशासाठी प्राणत्याग करणारी असंख्य देशभक्तीचीहि उदाहरणे आहेत. लोकमान्य टिळक, आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर,. त्याकाळचे देश स्वतंत्र होण्यासाठी प्राण वेचणारे असंख्य तरुण क्रांतिकारक, हे सर्वच सख्यभक्तीचे शिल्पकार आहेत. पूज्य गोळवलकर गुरुजीनीही एकदा एका साप्ताहिकात आपल्या जीवनाचे सूत्र कमीत कमी शब्दात सांगितले.: "मै नही, तू" पूर्ण भगवंताप्रति शरणागती,समर्पण भाव.

समर्थ सख्यभक्तीच्या समासात पुढे म्हणतात: परमेश्वर हा भक्तांचा कैवारी, अनाथांचा नाथ, पतितपावन, भक्तांचा सहाय्यकारी, उपासकांचा अंतरसाक्षी, कृपेचा सागर, करुणेचा जलधर आहे. तो शरणागताला नित्य अभयच देतो. म्हणून भगवंताविषयीची अनन्यता, समर्पण, शरणागती ही सख्यभक्तीची विशेषता आहे.

हे सर्व खरे असले तरी कधी तरी भक्ताची निष्ठा डळमळीत होऊ शकते. म्हणून समर्थ म्हणतात:

**आपल्या मनासारखे न घडे | तेणे गुणे निष्ठा मोडे | तरी गोष्टी आपणाकडे |
सहजची आली ||**

**मेघ चातकावरी वोळेना | तरी चातक पालटेना | चंद्र वेळेसी उगवेना | तरी चकोर
अनन्य ||**

आपल्या मनासारखी एखादी गोष्ट घडली नाही, तर असे कसे देवाने केले ? हा देवावरील अविश्वास ज्यामुळे निष्ठा डळमळल्यासारखी होते. असे होऊ न देता अविचल असणा-या निष्ठेचे उदाहरण समर्थ भक्ताला देतात. एखादे वेळी ढगाने पावसाची वृष्टी केली नाही तर चातक तहानलेलाच राहतो. पण ढगांवरील प्रेम सोडत नाही. चकोर पक्षी फक्त चंद्राचे चांदणे पिऊनच जगत असतो. चंद्र काही वेळा वेळेवर उगवला नाही तर चकोर भूकेलेलाच राहतो. चातक पक्षी आणि चकोरा सारखी निष्ठा

अविचल असावी. समर्थ म्हणतात आपण भक्तांनीही विवेकाच्या सहाय्याने, शक्तीने भगवंतावरील सख्यत्व दृढ करावे.

पुढे समर्थ म्हणतात:

**जैसा देव तैसा गुरू | शास्त्री बोलीला हा विचारू | म्हणौन सख्यत्वाचा प्रकारू|**
**सद्गुरुसी असावा ||**

जशी भगवंतावर निष्ठा, विश्वास, श्रद्धा ठेवावी तशीच आपल्या सद्गुरूवरही ठेवावी. सद्गुरू आणि भगवंत एकच आहेत.

दासबोधातील आठव्या समासात सख्यभक्तीची महती वेगवेगळी उदाहरणे देऊन समर्थ म्हणतात की जगात सख्यभक्ती करण्याजोगा भगवंत किंवा सद्गुरूच असतात. त्यांच्याशी मनाने आणि तनाने एकरूप होऊन जावे. आपल्या मनातील सर्व गोष्टी त्यालाच सांगाव्यात. तोच खरा सखा आहे. इतरांप्रमाणे तो स्वार्थी जिवलग नाही. तो शरण आलेल्याना कधीच विन्मुख पाठवत नाही. हे जाणून भक्तांनी भगवंत आणि सद्गुरू यांनाच सदासर्वदा सखा करून घ्यावा. अशा उपासनेचे गोमटे फळ भक्ताला मिळतेच मिळते. हेच सख्यभक्तीचे मर्म आहे.

**"जय जय रघुवीर समर्थ"**

**– डॉ.सौ. रसिका विलास ताम्हनकर**
वाशी, नवी मुंबई

अनित्याच्या संसर्गाने मायेतील व्यवहार योग्य आहे असे वाटत असते. प्रवृत्तीमार्गाला अनुसरून तुमच्या धर्माचे नियम तर तुम्ही पाळताच, त्यापासून प्राप्त होणारे पुण्य भोगून संपवावे लागते. तुमच्या धर्मात राहून या स्वरूपी रहाण्याच्या स्वधर्माचे आचरण करा.

– श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर

# अंतरंगातील श्रीरंग

आजच्या युगात ‘अध्यात्म’ हा शब्द जरी लोकांच्या जास्त वापरातला नसला तरी सोशल मिडीयाच्या प्रभावा खालील मराठी भाषिक किंवा इंग्रजीत लिहिणारे यांच्या कडून ‘आत्मा’, ‘soul’ हा शब्द सर्रास सहजतेने वापरला जात असल्याचे आपण पाहतो. कोणा WhatsApp ग्रुपवरील कोणा व्यक्तीचे निधन झाले की त्या मृत व्यक्तीला ‘भावपूर्ण श्रद्धांजली’ साठीचा रेडीमेड ‘नमस्कार’ दाखवत त्याच्या ‘आत्म्यास शांती लाभो’ हा मेसेजही सहजपणे ग्रुपवर ‘व्हायरल’ होतो. एवढे मात्र खरे की त्यातून त्या मृत व्यक्तीच्या शरीरात जिवंत असे पर्यंत ‘आत्मा’ नावाचा एक भाग होता जो शरीर मृत झाल्या क्षणीच त्यातून बाहेर पडला, एवढे कुणाच्याही नक्की लक्षात आले आहे. पण तेही तेवढ्याच प्रसंगा पुरते! स्मशान वैराग्यासारखे !

अध्यात्मशास्त्राचा अभ्यास करणारे लोक मात्र ‘आत्मा’ हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय म्हणून त्याकडे पाहतात. ‘अध्यात्म’ या शब्दामध्येच ‘आधी आत्मा’ असा अर्थ दडलेला आहे. म्हणजे आधी आपण आत्मा म्हणजे नेमके कोण हे पाहणे अध्यात्मशास्त्र शिकवते. भारतीय तत्वज्ञानाचा तोच मुख्य पाया आहे. वेद-वेदांत, उपनिषदे, नाना धर्म ग्रंथ, नाना शास्त्रे, पुराणे, संत वांग्मय, तत्वज्ञान यात याचाच बारकाईने उहापोह केला गेला आहे. पण एवढे जरी असले तरी मरेपर्यंत जवळपास आपण सर्वच जण हा खरा आपण कोण ? याचा विचार करण्याच्या भानगडीत जास्त पडत नाही. असे नाही की आपणा सर्वानाच हा विषय कळत नाही. पण कळले तरी वळत नाही एवढे मात्र खरे ! शिवगीतेत भगवान म्हणतात:

**|| नाना शास्त्रं पठेल्लोको नानादैवत पूजनं | आत्मज्ञानं विना पार्थ सर्व कर्म निरर्थकम ||**

अर्जुनाच्या माध्यमातून भगवान कृष्ण सांगतात की आपले स्वत:चे ज्ञान..

स्वरूपज्ञान म्हणजेच दुस-या शब्दात आत्मज्ञान जर नसेल तर नुसते ग्रंथपठण, देव-देवता पूजन याचा काहीच उपयोग नाही. ज्यांनी वेद, उपनिषदे, गीता ,शास्त्रे, पुराणे यांचा सखोल अभ्यास करून सार्थ श्री दासबोध ग्रंथ लिहिला ते समर्थ रामदास स्वामी यापुढे जाऊन अजून काही गोष्टींचा समावेश या श्लोकाच्या समर्थनात करतात ती दासबोधातील ओवी अशी:

**ध्यान धारणा मुद्रा आसन | भक्ती भाव आणि भजन | सकळ हि फोल-ब्रह्मज्ञान | जव तें प्राप्त नाहीं ||(५/१/३६)**

आत्मज्ञान नाही तर सगळेच फोल किंवा निरर्थक आहे 'हे पटवून देणे हा वरील श्लोकाचा किवा ओवीचा इथे उद्देश नसून आत्मज्ञानाची ओळख करून घेणे आयुष्यात सर्वप्रथम किती महत्वाचे आहे, हेच अधोरेखित केले गेले आहे. किंबहुना म्हणूनच त्याला 'अध्यात्म' म्हणजे आधी आपण हे नाव आले आहे.

सार्थ ज्ञानेश्वरीतील पहिल्या अध्यायातील पहिली ओवी

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।जय जय स्वसंवेद्या ।आत्मरूपा ॥ (१-१)**

आत्मरुपाची महती सांगून जाते. ॐकार हाच परमात्मा आहे या प्रत्ययाने श्री ज्ञानदेवांनी ग्रंथास प्रारंभ केला. सर्वांचे मूळ असणा-या व वेदांच्या प्रतिपादनाचा विषय असणाऱ्या स्वसंवेद्य ॐकाररुपी आत्मरुपाला ज्ञानोबा माउली नमस्कार करतात. त्याचा जयजयकार करतात.

**आपण वस्तु सिद्धचि आहे | मन मी ऐसें कल्पू नये |**
**साधु सांगती उपाये | तूंचि आत्मा ||(दा.८/१०/७५)**

श्री समर्थ रामदास स्वामी विरचित 'आत्माराम' या ग्रंथाची महती सांगताना ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज यांनी नमूद केले आहे की "सार्थ श्री दासबोध, जुना दासबोध, करुणाष्टके, मनाचे श्लोक इत्यादी सर्व समर्थ वांग्मयामध्ये समर्थांनी अंत:करण ओतले. पण 'आत्माराम'मध्ये त्यांचे हृदय सापडते. बद्धानेच नव्हे तर सिद्धाने सुद्धा 'आत्मारामा'पासून परमार्थ शिकावा." श्री रामदास स्वामीं यांनी त्यांच्या महानिर्वाणा नंतर शोकाकुल झालेल्या परमशिष्य कल्याणासाठी समाधीतून पुन्हा संजीवन दर्शन दिले आणि त्याच्या माध्यमातून सर्व जगाला आश्वस्त केले की

**माझी काया आणि वाणी| गेली म्हणाल अंत:करणी |परी मी आहे जग जीवनी |**

**निरंतर !! आत्माराम दासबोध| माझे स्वरूप स्वतसिद्ध |असता न करावा खेद | भक्त जनी ||**

यातूनच ‘आत्माराम’ ग्रंथाचे विशेष महात्म्य अधोरेखित होते.

या लेखाच्या निमित्ताने समर्थरचित “आत्माराम” ग्रंथाच्या आधारे प्रत्येकाच्या अंतरंगातील या चैतन्यरुपी आत्मारामाचा धांडोळा घेताना आत्मज्ञानी संत श्री निसर्गदत्त महाराज यांच्या निरुपणांच्या माध्यमातून हा अंतरंगातील श्रीरंग कसा स्पष्ट होत जातो ते मांडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे सद्गुरू श्री गोंदवलेकर महाराजांनी त्यांच्या निरीक्षणात दोन वेगवेगळे शब्दप्रयोग वापरलेत. पहिला शब्द ‘अंत:करण’ आणि दुसरा ‘हृदय’. ते तसे का म्हणतात असा साहजिकच विचार मनात येतो. एखादी गोष्ट अंत:करणात ठसते यापेक्षा जेव्हा ती तीरासारखी हृदयात आरपार घुसते, यात तीव्रता आणि परिणामकारकता खचितच जास्त आहे. समर्थांनी तीव्रता आणि अचूक परिणाम याचा विचार केला. ‘आत्मारामा’च्या पहिल्या समासातील २०व्या ओवीत हा ग्रंथ त्यांना का लिहावा असे वाटले सांगताना श्री समर्थ म्हणतात:

**दासबोधीचे समासी | निर्मूळ केले मीपणासी | त्या निरुपणेही वृत्तीसी | पालट दिसेना ||**

आयुष्यात श्रवणाचे माहात्म्य आणि महत्व किती आहे हे दासबोधात अनेक ठिकाणी वारंवार सांगितले गेले आहे. अगदी ४थ्या दशकापासूनच श्रवण, मनन, निदिध्यास यावर दीर्घ शिकवण साधकांना दिली गेली आहे. जरी भक्तीकडे प्रवृत्ती असली आणि अध्यात्माची आवड निर्माण झाली तरी पण आपण कितीही ऐकले, कितीही वाचले तरी ये रे माझ्या मागल्या अशी आपली सर्व सामन्यांची वृत्ती समर्थ जाणून आहेत. कारण जोपर्यंत तो आत्मबोध आपल्या हृदयात घुसला जात नाही तो पर्यंत आपल्या वृत्तीत अपेक्षित पालट होत नाही. तो पालट जोपर्यंत होत नाही तो पर्यंत ते वरवरचेच वाचन ! अंतरंगात पालट झाला नाही, होत नाही, वृत्तीत बदल होत नाही याचा अर्थ वाचनाचा परिणाम आतवर झालेला नाही. कुठला पालट ? तर वागणुकीत होणारा पालट, बदल. म्हणजेच आपणास जाणवणारा, अनुभवास येणारा पहिला परिणाम म्हणजे आपल्या वृत्तीत होणारा हळू हळू बदल. माझे-तुझे, मी-तू हा आप पर भाव हळूहळू कमी कमी होतो. अर्थात संत एकनाथ महाराज म्हणतात तसे

अंदर राम, बाहर राम, जह देखू वह राम ही राम ...अशी वृत्ती होणे म्हणजे निव्वळ संतपदाला जाणे होय ! तेवढी दीर्घ साधना, उपासना, अद्वैत सद्गुरुभक्ती, सद्गुरुकृपा यानेच त्या पदाची प्राप्ती!!

श्री निसर्गदत्त महाराज यांच्या शिकवणीत 'वृत्ती' म्हणजे काय आणि ती कशी पालटू शकते हे विवरण अनेक तपशील घेऊन आलेले आहे. त्याचा प्रथम थोडा आढावा घेऊन नंतर 'आत्माराम' ग्रंथाची आवश्यकता आणि महती लक्षात घेऊ या.

**निसर्गदत्त महाराज :**

**वृत्त, वृत्ती** आणि **निवृत्त** असे तीन शब्द आहेत. **'वृत्त'** हे ब्रह्म. **'वृत्ती'** ही माया आणि **'निवृत्त'** हे **परब्रह्म.** वृत्त म्हणजे जाणीव, वृत्ती म्हणजे मन आणि निवृत्त म्हणजे कशाचेच साक्षित्व नाही. साधना वगैरे.. हा वृत्तीला दिलेला अभ्यास आहे. वृत्तज्ञान सर्वांना सारखे. पण वृत्तीज्ञान सर्वांना सारखे नाही. झोपेत पडलेले स्वप्न सर्वांना सारखे असेल काय ? ..तसे ज्ञान प्रत्येकाला सारखे नाही. तुम्ही तुम्हाला आहात असे भासता ते आत्मवृत्त कालधर्माप्रमाणे व्यवहार करत असते. त्याच्यातून वाहणारी वृत्ती म्हणजे मन. वृत्ती म्हणजे तुमचा अवघा संसार. वृत्तीलाच व्यवहारात मन असे म्हणतात. जोपर्यंत वृत्ती नृत्य करते आहे...इकडे जा-तिकडे जा असे.. तोपर्यंत तुम्ही ज्ञानाला लायक नाही. मन म्हणजे माया. मन म्हणजे वृत्ती. नीट ऐकून ठेवा. वृत्तीच्या सहवासात जाऊ नका. जशी वृत्ती तशी वागणूक. व्यवहाराने व्यवहारते ती वृत्ती. वृत्तीची आवड आणि त्या आवडीप्रमाणे आपल्या कल्पनेचे बंधन राहते.

या वृत्तीच्या गुणाचे, अर्थाचे, परिणामाचे भय वाटत असते. वास्तविक वृत्ताला भय कसले ?

वृत्तीज्ञान संपल्यावर फक्त वृत्तज्ञान राहते. त्या अवस्थेत निवांत दिव्याच्या ज्योतीसारखी अवस्था असते. त्यावेळी मन नसते, विचार नसतात. केवळ आपण आहोत एवढीच जाणीव असते.

निसर्गदत्त महाराजांच्या भाषेचे वैशिष्ठ असे आहे की रोजच्या वापरातल्या शब्दाची ते त्यांच्या नैसर्गिक शैलीत फोड करतात. जसे ते 'वृत्त' शब्द वापरतात. वृत्तपत्र, वृत्त निवेदिका इत्यादि शब्दांमुळे सर्वांना परिचित 'वृत्त' शब्दाचा अर्थ

'बातमी'. हा  रोजच्या व्यवहारातील शब्द वापरत असताना  'वृत्त 'म्हणजे ऐकलेली किंवा वाचलेली किंवा कानावर आलेली 'बात- मी' अशी त्याची ते फोड करतात. ज्यात 'मी' आहे ती बात या अर्थाने आपणास विचार करायला  लावतात. जन्म झाला म्हणजे ते बाळ जन्माला आले. म्हणजे ते 'मी आहे' ही बातमी घेऊनच जन्माला आले.  ते 'जन्मवृत्त' किंवा 'बात-मी' ज्याला त्यांनी 'आत्मवृत्त ' हा पण काहीवेळा शब्दप्रयोग वापरला आहे. ती बातमी जर आली नाही तर जन्माला आलेला, बोलणारा, ऐकणारा कोणीच अस्तिवात असू शकत नाही.

'मी आहे' अशी जी जाणीव प्रत्येकास आहे तीच ती आपण **'असल्याची'** बातमी. तेच ते आपण असल्याचे ज्ञान...'वृत्त'ज्ञान ! हे वृत्तज्ञान सर्वांना सारखेच आहे. ते आहे तोपर्यंत सर्व व्यवहार होताहेत. पण ते देह-मनाच्या पातळीवर होत असल्याने त्याप्रमाणे वागणूक होत असते. ही वागणूक म्हणजेच प्रत्येकाची वृत्ती... पण जिचा आधार आहे केवळ 'मी आहे' हे वृत्त. सद्गुरुबोधाने जेव्हा साधक 'देह-मन मी नव्हे' या पातळीवर पोहचतो तेव्हा पासून त्याच्या वृत्तीत बदल होत तो आपण केवळ ज्ञानमूर्ती या वृत्तज्ञानाशी निगडीत राहतो. देह-मनाच्या पासून अलिप्त होण्याचा अभ्यास सुरु होतो. त्या अवस्थेत निवांत दिव्याच्या ज्योतीसारखी अवस्था अनुभवायला सुरुवात होते. मन एकाग्र होते, विचार मावळू लागतात. केवळ 'आपण आहोत' एवढीच जाणीव साधक अनुभवतो. विस्तारभयास्तव निसर्गदत्त महाराज यांच्या शिकवणीतील जास्त तपशील इथे देता येणार  नाही. त्यासाठी महाराजांच्या शिकवणी वर आधारित अनेक पुस्तके, ग्रंथादी साहित्य वाचकांना उपलब्ध आहे ज्याचा सखोल अभ्यास जिज्ञासू करू शकतील.

आपापल्या भावाप्रमाणे, सवडीप्रमाणे, शक्तीप्रमाणे, आवडी प्रमाणे प्रत्येक भाविक देवभक्ती करतो. जया आवडे भक्ती जे तेची मोठी. नियमित दासबोध वाचन करणारे, वर्षानुवर्षे त्याची पारायणे करणारे अनेक भाविक जन आहेत. मायेच्या बंधनातून सुटका व्हावी मनापासून इच्छिणारे असंख्य  प्रापंचिक जन आहेत. आपले पारमार्थिक जीवन समृद्ध व्हावे यासाठी भक्तीमार्ग आचरणारे साधक आहेत.  या सर्वांच्या कल्याणाची समर्थांना कायम चिंता लागली आहे. 'कल्याण करी रामराया, जन हित विवरी..' आपल्या आराध्य दैवत रामरायापाशी हे सतत मागणे त्यांनी मागितले.

व्यावहारिक जीवनात कसे वागावे, नवविधा भक्ती म्हणजे काय,  सद्गुरू कोण? सत्शिष्य कसा असावा अश्या अनेक विषयावर सखोल मार्गदर्शन दासबोधातून प्राप्त होते. गुरु-शिष्य संवादरूपी दोनशे समास वाचून ऐकून जरी एखादीही  आशंका

शिष्यांच्या मनात आली नाही तरी समर्थ जाणून होते की काही शिष्य मंडळीची देहबुद्धी अजून पूर्ण नाहीशी झालेली नाही आहे. 'देहबुद्धी ते आत्मबुद्धी' कशी करावी याचे त्यांना सर्वार्थाने पूर्ण ज्ञान झालेलं नाही. त्यांचा मीपणा गेलेला नाही, आत्मनिवेदन भक्तीचे वर्म त्यांना उमगलेले नाही, माया मोहिनीचे रहस्य उलगडलेले नाही. म्हणूनच समर्थ कनवाळू होऊन हजारो ओव्या असलेल्या दासबोधाच्या तुलनेत केवळ १८३ ओव्यांचा ग्रंथ आपल्या हाती देऊन सांगतात की आता तरी हा छोटासा ग्रंथ वाच, मनन कर, नि:संदेह हो. एकूणच अंतरंगातील श्रीरंग लोकांना  कसा कळेल याची सतत चिंता लागलेले समर्थ 'आत्माराम'च्या सुरुवातीस म्हणतात...

**'तुवा आशंका नाही घेतली | परंतु मज तुझी चिंता लागली | का जे तुझी भ्रांती फिटली | नाहीच अद्यापि ||'(आ.१/१९) 'म्हणोनी न पुसता सांगणे | पडले शिष्य तुज कारणे | आता तरी सोय धरणे | श्रवण मननाची||(आ.१/२१).**

**श्री निसर्गदत्त महाराज:**

आम्ही जन्मभर ऐकतो आहोत..ढीग! खूप ऐकलं आहे. कोणत्या शब्दाचा परिणाम झाला आहे ?..कोणावर ? जोपर्यंत शब्दाचा परिणाम झाला नाही तोपर्यंत ते कसं काय म्हणायचं त्याला ज्ञान ? जन्मभर ऐकतो. कोणत्या शब्दाचा परिणाम झाला आहे तुमच्यावर?  त्या वाणीच्या शब्दाचा आणि अर्थाचा परिणाम झाला नाही ज्याच्यावर, त्याला काय कळले..बरे की वाईट ? आणखी जन्म घेऊनसुद्धा तुम्ही ऐकाल..करमणूक म्हणून ! काही टाईमपास होतो. त्यापलीकडे काय आहे ! ऐकलेल्याचा रवंथ करा. फक्त तुम्ही ऐकायचे आहे. सक्रीयतेची गरज नाही आहे. श्रवण, मनन, निदिध्यास..शिवाय तुमचं कोडं सुटणार नाही. खंडोगणती ग्रंथ पाठ करून काही होणार नाही.

सद्गुरूमुखातून कानावर पडणारे श्रवण असे ऐकले पाहिजे की ते वचन हृदयामध्ये घुसले पाहिजे.  आत्मारामाच्या दुस-या समासात हे वर्म समर्थ सांगताहेत..

**शिष्या बहु मन घाली| आता बाष्कळता राहिली | येथे वृत्ती चंचल केली | तरी बुडसी संदेह सागरी ||(२/६)**

..नुसते ऐकणे पुरेसे नाही. मनाच्या चंचल वृत्तीला प्रयत्नपूर्वक आवरले पाहिजे, नाही तर जन्मभर पारमार्थिक श्रवण करूनही संशय दूर होत नाहीत. संशय हेच ज्ञान

प्राप्तीला आड येणारे बंधन. परमार्थ मार्गात जी जी सर्व साधने इत्यादि सांगितली आहेत त्यातील सर्व साधनांचे सार म्हणजे श्रवण आणि मनन असे समर्थांनी आत्माराम ग्रंथात विशद केले. अध्यात्म निरुपणाचे श्रवण आणि त्याचे मनन करण्याने साधक सिद्धावस्थेला जाऊ शकतो एवढे सामर्थ्य श्रवणभक्तीत आहे. आत्मारामाच्या ४थ्या समासात ते सांगतात:

**जे सकळ साधनांचे सार, ते हे जाण रे श्रवण ||(४/२)**

केवळ श्रवणच पुरसे आहे का ? ग्रंथात समर्थ ठासून सांगतात. त्याला पर्यायच नाही.

**श्रवण आणि मनन | या ऐसे नाही साधन ||(४/५)**

एकाग्रतेने केलेले श्रवण यापेक्षा तुला आणखी दुसरे कुठले साधन कधी करावेच लागणार नाही ही माझी प्रतिज्ञा आहे असे समर्थ वचन देतात..आजच्या भाषेत ग्यारंटी !!

मन, मनाची चंचलता, मनातील कल्पना तरंग, मनाची अस्थिरता, मनाची दोलायमान अवस्था, मनाची एकाग्रता, मनाची विचारशून्य अवस्था,..असे अनेक शब्दप्रयोग अध्यात्मशास्त्राचा अभ्यास करताना आपणाला सापडतात. ध्यानाला जरी बसलो, नामस्मरणात जरी एकग्रता साधायला गेलो, तरी विचारात एवढे वाहून जायला होते की ध्यान बाजूला राहते आणि अखेरीस समाधान काही लाभत नाही. अशा अशांत मनाला एकाग्र करणे किती दुरापास्त आहे ? आणि तसे ते एकाग्र झाले की नंतर मग अध्यात्मश्रवण करणे आपणाला अजून कठीण दिसायला लागते. हे कसे काय जमायचे ही मुख्य अडचण असते. दासबोधात यावर समर्थांनी आपल्यासाठी एक रस्ता दाखवला तो असा :

**आपण वस्तु सिद्धचि आहे | मन मी ऐसें कल्पू नये | साधु सांगती उपाये | तूंचि आत्मा ||(८/१०/७५)**

**निसर्गदत्त महाराज** मार्गदर्शन करताना म्हणतात:

> ‘मन’ ही दोनच अक्षरे प्राणीमात्राला चकरा मारीत फिरवितात. मन हीच कल्पना आणि कल्पना म्हणजेच मन. कल्पनेला जे आवडते त्यालाच ती जन्म देते. मनाचेच हे सर्व मनोराज्य. सर्व विषयांचे कल्पक आहे ते मन आहे.
>
> एकटेच आरामखुर्चीत पडले असाल तरी हे सुचले-ते सुचले...आराम

घ्यायचा राहिला बाजूला. जे काय सुचले त्यातच रमतो. मग त्यात भांडण असेल, अमुक असेल इत्यादि, इत्यादी. दुसरा म्हणतो तो आराम घेतो. कसचा आराम घेतो आहे ! त्याचे मन जे म्हणते त्यातच रमला आहे. आहेत की नाहीत असे अनुभव?

मन विसाव्याला गेल्याशिवाय तुम्हाला झोप नाही, आरामही नाही. झोपेत मन नसते. फक्त प्राण असतो. मन जेव्हा तयार होते ते मन नांवाचे दृश्य तयार होते. त्याला तुम्ही स्वप्न म्हणता. स्वप्न म्हणजे मनाचा अवतार. स्वप्न पाहाता तेव्हा तुमचे मनच जगरुप दिसते. तसेच हे जागृतीतले जगही मनाचा अवतार. तुम्ही मनावर अवलंबून राहता नी मन आवरत नाही म्हणता !

प्राणामुळे देह, प्राणामुळेच मन. श्वासोच्छवासाचा जो अर्थ लागतो आहे त्याला मन असे म्हणतात. जोपर्यंत श्वासोच्छवास आहे तोपर्यंत कसल्या ना कसल्या म्हणी वाहतच असणार. त्याला मन असे म्हणतात.सगळे विषय मनातच असतात. ज्याच्याकडे मन नाही त्याच्याकडे विषय काय आहेत ? विषय म्हणजे हे आठवले-ते आठवले. हे पाहिजे–ते पाहिजे. मनाच्या म्हणी हेच ते नाना विषय.

अन्नरसाच्या गुणामध्ये जाणवते असे मन आहे. मन हे प्राणाचे नांव आहे. अहंभाव, अहंकार ही प्राणाची नांवे आहेत. प्राणाची हालचाल तेच मन. प्राण नसताना मन आहे काय ?..नाही ! शरीरपदार्थ बिघडला, आजार आला, म्हणून प्राण गेला. प्राण गेला म्हणून मनही गेले. मन तिथे प्राण. प्राण तिथे गुण. मनाला जाणल्यावर तो प्राण विसर्जन होतो. तुम्ही शरीररुपी झाल्यानंतर ‘आहे’ असे वाटले आणि त्यातून ‘म्हण’..म्हणजे मन निर्माण झाले.अन्न, प्राण, काया, मन यांच्या केंद्रस्थानी आत्मरूप आहे..आपण असल्याचे ज्ञान.

तुम्ही आकाररहित आहात हे हळू हळू मनाच्या ध्यानात येईल तेव्हाच मन ताब्यात येईल. मनाचा छंद सोडून आत्मछंद घ्या. मन कधीच नाहीसे होणार नाही. आपण म्हणजे काय हे पाहात बसायचे. मनाचा सल्ला घ्यायचा नाही. मन चालू असते. असू द्या ! तू मन नाहीस हे पक्के करायचे. मनाबरोबर वाहून जातो म्हणता. पण तुम्ही असल्याचे ज्ञान वाहून गेल्याचे पाहिले आहे काय ? तुम्ही पछाडले जाता. म्हणजे मनाने मनच पछाडले जाते. तू काय नी कशाने पछाडला जाणार ? तुझा त्यात संबंध काय ? पोराबाळांची चिंता

तू करतो, की मन करते ? मन तुला ओळखते, की तू मनाला ओळखतोस ? मन भूत-भविष्य सांगतंय ते तुझे म्हणून का स्विकारतोस ? काया असेपर्यंत तुझी ओळख म्हणून तू कायेत काय आहेस ? तुला भासणारा शब्दप्रकाश तू स्विकारलास, तरच मन भासेल.

ध्यानात मन एकाग्र होत नाही, काही केल्या विचार थांबत नाहीत. नीट नामस्मरण होत नाही. अशा अनेक तक्रारी असतात. निसर्गदत्त महाराज मार्ग सांगताहेत की “आपण म्हणजे काय हे पाहात बसायचे. मनाचा सल्ला घ्यायचा नाही. मन चालू असते. असू द्या ! तू मन नाहीस हे पक्के करायचे.” तोच उपदेश समर्थ आत्माराम ग्रंथात करताहेत:

**अरे तू कोण ? कोणाचा ? कोठोनी आलास कैचा ? | ऐसा विचार पूर्वीचा | घेई बापा || (आ. १/२५).**

या उपदेशामुळे मनात आलेले किंवा येत असलेले इतर विचार मग साधक बाजूला सारून ‘आपण कोण ?’ या विचारावर स्थिर होऊ लागतो. मग पुढील समासात त्याला अजून एक पायरी समर्थ पुढे नेतात आणि ‘माया’ आणि तिने व्यापलेले भ्रामक रूप याचे वास्तव दाखवतात. जन्मभर आपण प्रत्येक जण बोलताना,कर्म करताना ‘मी’ असे स्वत:विषयी संबोधतो. तो ‘मी’ म्हणजे अहं असे जे नैसर्गिक स्फुरण प्रत्येकाकडे आहे म्हणून तो म्हणू शकतो. परंतु ते स्फुरण मुळातच मायारूपी आहे हे स्पष्ट करताना समर्थ म्हणतात:

**अहं ऐसे जे स्फुरण | तेचिं मायेचें लक्षण | तये मायेपासून त्रिगुण | गुणापासून भूतें || (आ.२/११)**

एवढेच नव्हे तर संपूर्ण आत्माराम ग्रंथात सर्वात जास्त ओव्या (४३) समर्थांनी ‘माया विवरण’ करण्यासाठी वापरल्या आहेत. यावरूनच ‘माया’ आणि तिचा प्रभाव किती मोठा आहे हे आपल्या लक्षात येते.

निसर्गदत्त महाराजांच्या अनेक निरुपणातून त्यांनी ‘माया विवरण’ केले आहे ते थोडक्यात पाहू या:

माया म्हणजे न झालेली गोष्ट. न वावरणा-याला ‘वावरलो’ अशी खात्री वाटणे. ही सर्व मनाची कहाणी. कल्पना म्हणजे माया. आहे, दिसते, भासते,

कळते पण ते राहत नाही हीच माया.

'माया' या शब्दाचा अर्थ "नाही ती". भुरळ किंवा विसरून गेलेले आहे. नाही ते होय मानतो, होय आहे तिकडे ढुंकून बघत नाही. दिसे-भासे परी ते टिकून रहात नाही हीच ती माया. दृश्य निर्माण होते, अदृश्य होते. टिकाऊ काही नाही. म्हणून त्याला माया म्हणतात. वास्तविक काही नाही ती माया. जीवाला देहाचा अभिमान घेऊन व्यवहार करायला लावते ती माया.. जन्माचे तुम्हाला ज्ञान आहे का ? की या जगात तुम्हाला जन्माची माहिती आहे ? जन्माचे ज्ञान नाही. नकळत 'देह हे माझे रूप आहे' असे म्हणायला भाग पाडले आहे. याचे नांव भुरळ, माया.

भूल दिल्याशिवाय कोणाला कोणी ठकवू शकत नाही. स्त्री असो वा पुरुष, चोर असो, दरोडेखोर असो, जादुगार असो, कोणीही असो. अगोदर काय करील ? अगोदर भुलवील, नंतर मात्र ठकवील. आज जगामध्ये लाखो माणसे ठकवताहेत. आयुष्याची माती करून घेतली. भुलले. हे अज्ञान.. म्हणजे माया..अगोदर भुलवते आणि भुलवल्यानंतर ठकवते.

मायेतून हे सर्व उद्भवले. मायेपासून कुणीच वेगळा नाही. मायेने सर्व व्यापलेले आहे. आत्माराम ग्रंथात  समर्थांनी 'माया विवरण' पुन्हा एकदा संक्षेपाने केले. माया म्हणजे मुळात नाशिवंत जे आहे,  ते कधीच टिकणार  नाही, त्याचा लय होणार. पंचभूते, सकल सृष्टी सर्व काही अदृश्य होते अशी माया आहे.  तीच प्रकृती-पुरुष रूपाने वागते आहे. तीच ज्ञाता, तीच ज्ञान आणि तीच ज्ञेय. तीच ध्यान, तीच ध्येय, तीच ध्याता. तीच निजबोध. तीच आत्मा, तीच ब्रह्म, तीच आपले स्वरूप. विश्वाला व्यापून राहिलेली माया तीच जीव, तीच शिव, तीच ईश्वर, तिच्यानेच अवघे दृश्य भासते आहे. तिच्यानेच पंचमहाभूते जाणवत आहेत.

माया म्हणजे भ्रम, नाशिवंत, काहीच राहणार नाही, सर्व काल्पनिक असे ऐकल्यावर  त्याचवेळी एकूण एक सर्व काही मायेने व्यापलेले असा  मायेचा प्रभाव ऐकल्यावर कोणालाही थोडे गोंधळल्यासारखे होणे साहजिकच आहे. आत्माराम ग्रंथात हीच स्थिती शिष्यांनी समर्थांकडे व्यक्त केली.

**सकळ माया ऐसेही म्हणता | आणि झालीच नाही ऐसेही सांगता | तरी म्या काय करावे आता | सांगा स्वामी ||(२/२६)" समर्थ त्याच्या गोंधळलेल्या मनाला धीर देत म्हणतात: अरे ! मनासी जे जे अनुभवले | ते ते मायिक नाथिले  | तितुके तुवा**

**टाकिले | पाहिजे स्वानुभवे ||(२/२८)**

त्यासाठी कोणती युक्ति शिष्यांनी वापरावी ती सुद्धा ते सांगतात:

**येवं सांगतो ते ऐकावे | माईक मायेने जाणावे | आता मनन करावे | सावध होऊनी ||(२/२९) इथे समर्थ एक उदाहरण देतात : का त्या कोवडीयांच्या कडीया | गुंतगुंतोनि उगवाव्या | तैसी जाण हे माया | गुंतोनी उगवावी ||((३/३०)**

**सारांश:** मायेतून सुटका करून घ्यायची असेल तर मायेत गुंतूनच ती करून घ्यावी लागते. त्यासाठी विवेकाची किल्ली वापरावी लागते असे समर्थ म्हणतात.

**वर्म हेचि माया मायिक | याचा करावा विवेक | विवेक केलीया अनेक | येकी मुरे ||(३/३३)**

**निसर्गदत्त महाराज :**

स्व-स्मरण म्हणजे जाणीवकळा,. चैतन्यकळा. नात्याने आप्तपणा. आज तुम्ही ज्या आठवणीने आहात ती आठवण कधीही असणार नाही. काया पडल्यावर तीही जाईल. ‘मी आहे’ ही जाणीव हाच देव, तीच माया. माया म्हणजे देवाची शक्ती. देवाची जेवढी नांवे आहेत; ती ‘आपण आहे’ या जाणीवेचीच ! माया म्हणजे गुण. प्राणीमात्राला जाणवणारी जाणीव. माया म्हणजे आत्मप्रेम. अनंत नांवे मायेचीच. तिलाच देवपद दिलेले आहे. निर्विकल्प स्थितीमध्ये कल्पना आली तीच माया. दृष्यामध्ये दृष्य आपण असल्याची जाणीव. अदृष्यामध्ये अदृष्यही आपण असल्याची जाणीव.

‘मी शरीर आहे’ हे फक्त अज्ञानाने म्हटले आहे. अज्ञान म्हणजे भुरळ. भुरळ म्हणजे भ्रम, काया हेच आपले रूप असे वाटत आहे हीच माया. कोणताही देह शेवटी जर्जर होऊन नाहीसा होतो, म्हणून त्याला ‘मायावी’ म्हणायचे. मायावी म्हणजे टिकावू नाही.

पंचभुते, त्रिगुण हे सर्व जाणीवेतून जन्म घेतात हे ज्ञान झाले पाहिजे. जाणीव म्हणजे अखंड ब्रह्मांड. अन्न आहे तर प्राण आहे आणि प्राण आहे तर गुण आहे. या गुणालाच प्रकृती-पुरुष अशी नांवे आलेली आहेत. जग आणि जगाचे अनुभव आणखी आपण. आता आपला म्हणून जेवढा अनुभव येतो आहे तेवढा प्रकृतीचा आहे. पुरुष जो आहे तो फक्त द्रष्टा आहे. क्रियेमध्ये त्याचा काही भाग नाही. आपण असल्याची आठवण दोन प्रकारे व्यवहारते..

प्रकृती-पुरुष. प्रकृती-पुरुष व्यवहारत नसतील तर आठवण उपलब्ध होणार नाही. आपण असल्याची आठवण नव्हती आणि आता ती आहे, या पलीकडे तुमच्याकडे आहे काय ! आठवण तेच ज्ञान. ज्ञान तेच ध्यान. ध्यान तेच आपण. आपण म्हणजेच विश्रांती. प्रथम वृत्तीना निवृत्त व्हावे लागते. मग स्वरूपप्राप्ती.

आत्माराम ग्रंथाचा समारोप करताना समर्थांनी स्वरूपज्ञानप्राप्तीचे महत्व विशद करताना म्हटले:

**बहुतां जन्मांच्या शेवटी | जाली स्वरूपेसी भेटी | एका भावार्थासाठी | परब्रह्म जोडले ||(५/११)**

वेद-वेदांताचा सारांश म्हणजे ते आपले स्वयंभू स्वरूप आहे, तेच परमात्मा आहे. असे हे ज्ञान ज्यांना होते ते परमभाग्यवान आहेत. त्यांचे दैव उगवले. त्यांचे अज्ञानरुपी बंधन तुटोन जाते. सद्गुरूकृपेने सर्वसाक्षिणी तुर्या अवस्थेच्याही पलीकडे जे विज्ञानरूप आहे ते प्राप्त झाल्याने साधक नि:सदेह होतो.

**...नि:संदेह जाले अंतर्याम | सद्गुरुचरणी ||(५/२८)**

“आत्माराम” ग्रंथाच्या शेवटच्या म्हणजे पाचव्या अध्यायात माया निवारण झाल्याने संदेहरहित झालेला शिष्य मुख्य ज्ञानाचे लक्षण, **‘परमात्मा तो तूंचि जाण’** हा प्रत्यक्ष अनुभव घेतो आणि कृतकृत्य होतो. आपल्या जन्माचे सार्थक झाले म्हणतो. मायेने भ्रमित झाल्याने स्वत:ला मरणा-या जातीचा सामान्य माणूस म्हणून मानणा-याला सद्गुरू उपदेशाने स्वरूपाचे भान आले आणि तो तत्काळ स्वये आपणच विश्वंभर आहोत, निर्गुण निराकार परमात्मरूप आहोत याची त्याला खात्री पटली. आपण करुनी अकर्ता, परेहून परता, सर्वांभूती आपणच सामावलो आहे, आता गुरुशिष्य पण भेद उरला नाही याचा निश्चय स्वरूपज्ञानाने शिष्य अनुभवतो.

स्वरूपज्ञानी संत **श्री निसर्गदत महाराज** या अवस्थेचे वर्णन करताना म्हणतात:

देहाचे बंधन आल्यामुळे शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध..पांचही प्रकारच्या अनुभवाचे, क्रिया-धर्माचे प्रत्येक क्षणाक्षणाला बंधन पडते आहे. ते कुठपर्यंत चालणार आहे ?..तर देह हे आपल्या ओळखीचे प्रमाण असेल तोपर्यंत ! पण ज्या क्षणाला त्याने देह ‘स्वरूप’ नव्हे, आपले रूप नव्हे अशी गोष्ट

त्याच्या ध्यानात आली त्याचवेळेला जशी कांच फुटे फट्कन..तशी त्याची सर्व बंधने तुटलेली आहेत असे दिसेल. आपले सध्याचे असणे हा हंगाम आहे हे ज्याने ओळखले तो हंगामी नसणार. आनंद हा गुण आहे आणि गुण जातीने निर्गुण आहे. खुशाल जगाचा व्यवहार केला, पण जात काय त्याची आहे ?..निर्गुण ! आत्मस्वरूप आधी आहे. त्याच्या उच्चाराला सृष्टी ही उपमा आहे. निर्गुण हे प्रत्येकाचे स्वकीय आहे. त्या राजाधिराजाचे स्वरूप आहे. तुमच्या कायासत्वातील गुण...'सगुण ब्रह्म'..स्वत: असल्याचे ज्ञान, तोच हरी, भगवान. अशी श्रद्धा हळू हळू आत्मसात केली आहे तो देहीच विदेही आहे, गुणीच निर्गुण आहे आणि पुरुषी असतानाच निर्वाण आहे.

ज्ञाता ज्ञानमय, कायामय, जगमय असूनही तो निर्गुण आहे. सगुण वा निर्गुण केवळ स्वरूप आहे. ज्ञानाने ज्ञानाला ओळखले, तात्काळ विज्ञान झाले. म्हणजे ज्ञानपण निमाले. गुणपण निर्गुण झाला. गुणाचा गुणपणा जाऊन गुण निर्गुण होतो हे ज्ञात्याला स्पष्ट दिसते. कसे ?..तर तुम्ही डोळे झांकून बसला हे तुम्हाला कसे कळते ?..आत्मज्ञानाने ! देह असतानाच ज्ञानाचे विज्ञान झाले म्हणजे, देह आपण नव्हेच पण ज्ञानही आपण नव्हे असे झाले.

गुण पुष्कळ व्यवहारतो. पण आत्मज्ञान झाल्यावर तो निर्गुण होतो. जयगुरू करून जो गुण शुद्ध झाला, पवित्र झाला, तो निर्गुण होतो. कृष्णाने पुष्कळ व्यवहार केला पण गुणाचा त्याला स्पर्श झालेला नाही. जिवंतपणी व्यवहार करत असताना निर्गुण आहे असे कोण म्हणेल ? निर्वाण म्हणजे नमुना ज्याचा रहात नाही. गुण नव्हेसा होतो ते निर्वाण. तुमच्या कोणत्याही क्रियेचा आकाशाला काही स्पर्श होत असेल, पण निर्गुणाला होत नाही. विनागुण सत्वाला आपण आहे हे ज्ञान नाही. गुणाचा उद्भव, स्थिती आणि लय ज्याने जाणले त्याने वाचा बंद केली. जाणपण किंवा ज्ञान जिथे विराम पावते ते परमात्मस्वरूप. त्याला कालधर्म नाही. स्वरूपदर्शन झाल्यावर अहंभावाचा लवलेश शिल्लक रहाणार नाही.

ज्याला आत्मज्ञान झालेले आहे त्याला जगामध्ये वेगवेगळे काही भासत नसून ते त्याचे स्वरूप सर्वत्र परिपूर्ण भरलेले आहे असा त्याला अनुभव येतो. 'स्व'हे विज्ञान !! भेदशून्य झाले. भेद जो भासत होता तो भेदशून्य झाला. स्वरूप म्हणजे आपणच असे जाणवले. याच्यामध्ये त्रिपुटी नाही. द्रष्टाच ! प्रत्येक प्राण्याला 'मी असल्याची जाणीवकळा' हीच ईश्वराची विभूती होय.

आपणाला आपण आहे हे दर्शविते ते प्रकाशरूप आहे. नुसता प्रकाश नसून 'ज्ञनप्रकाश आहे. चित्प्रकाश. केवळ शुध्द असे आत्मस्वरूप आहे. देहाला हलविते, चालविते, पळविते ते आपले रूप आहे. त्याच्या ओळखीकरता व्यवहारासाठी नांव दिलं पाहिजे. मग नांव सांगितले, 'परमात्मा'. पण परमात्मा कोण ?..तुझ्या ठिकाणी तू आहेस हे ज्याच्याने कळते तोच ! सर्व ठिकाणी व्यवहारतो पण कोणत्याही व्यवहाराचा त्याला ताठा नाही, गर्व नाही, अहंकार नाही. तो सर्व काही जाणतो पण कोणत्याही जाणीवेचा बांधलेला नाही. मग निंदा कोणाची करणार ? आत्मज्ञान होईपर्यंतच तुम्ही निंदा करणार ! जिथे ज्ञान घन होते तिथे दया काम करते. ज्ञान्याकडे फक्त दयाच उरलेली असते. ज्ञानी कोणाशी स्पर्धा करत नाही म्हणून त्याला निंदा, द्वेष, मत्सर नाही. आत्मस्वभावास जाणल्याशिवाय संतांची सेवा काहीही होणार नाही.

सद्गुरूभक्त एकनिष्ठ असेल तर अंतर्यामी तो पुरा पुरा होतो. निजांगे सदगुरू स्वरूप होतो. इथे एका आत्मनिश्चयाचे काम आहे. परमात्मस्वरूप स्वरूपज्ञानानेच पूर्ण होते. अहं हा कल्पित पुरुष आहे, असे ठरल्यावर बंध नाही, म्हणून मोक्षही नाही. आहे ते सर्व परमात्म स्वरूपच आहे अशी निजांगे प्रचिती येईल. आकाश ज्याला दिसते, ते आकाशाच्या आधी आहे. मग त्याला बंधन कसले ? त्याला मळ कसा लागेल ? काही क्रिया न करता सहज अवस्था म्हणून जी आहे, ते यथार्थ स्वरूप आहे. त्यात बुद्धीकल्पना नाही. स्वरूपज्ञान झाल्यावर ही सहजावस्था असते.

**– अनिल चुबे**
९८१९२१४६६

देहभाव विसरणे म्हणजे विदेह ! नामस्मरण करून देहभावाचा विसर पडलेली जी अवस्था असते, देहभाव नाहीसा झालेली जी स्थिति असते त्याला विदेह-स्थिती म्हणावी.

– श्री अंबुराव महाराज



"सद्‌गुरू वचनावर अचळ, अढळ विश्वास ठेवा. त्याच्याचे सर्व उघड होईल.
गुरू किंवा देव व्यक्ती नव्हे, हे एक अगोदर लक्षात ठेवा.
गुरू व्यक्तीसारखा दिसतो, पण तो व्यक्ती नव्हे, गुरू किंवा देव
व्यक्तीरूप मानतात त्यांना पूर्ण समाधान मिळणार नाही.
गुरूवचनापेक्षा काहीही झालं तरी ते फार हीन दर्जाचं आहे.
मग साक्षात श्रीविष्णू , मी त्रैलोक्यनायक विष्णू आहे म्हणून जरी उभे
राहिलेत तरी कस्पटास्पद आहेत. ज्याने गुरूवचन पाळले तोच संत,
तोच स्वयें आत बाहेर राबतो, गुरूवचन, संतवचन श्रेष्ठ आहे.
ज्यांनी संत वचन पाळलं, तेच संत झाले."

-सद्‌गुरू श्रीनिसर्गदत्त महाराज